
रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १७ ◆ अंक १५३
www.ramprahar.com
# राम प्रहर
गुरुवार, १९ डिसेंबर २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

### अंतरंग

जातीवाचक शिवीगाळप्रकरणी पाच जणांवर गुन्हा दाखल/२
रोजगार निर्मिती कार्यक्रम; उद्योजक बनण्याची सुवर्णसंधी/५
भारत-ऑस्ट्रेलिया गाबा कसोटी अनिर्णित/८

## माझ्या वक्तव्याचा काँग्रेसने विपर्यास केला -ना.अमित शाह




**नवी दिल्ली :** काँग्रेस बाबासाहेब विरोधी आहे. काँग्रेस आरक्षण विरोधी आहे. काँग्रेस सावकरविरोधी आहे. या सर्वांचे उत्तर काँग्रेसकडे नाही. यामुळे काँग्रेस आता संभ्रम निर्माण करत आहे. माझे पूर्ण वक्तव्य राज्यसभेच्या रेकॉर्डवर आहे. मी किंवा माझा पक्ष स्वप्नातही बाबासाहेबांचा अपमान करू शकत नाही. संपूर्ण देश बाबासाहेबांच्या संदर्भात आदर व्यक्त करतो. मी काँग्रेसच्या या प्रयत्नाचा निषेध करतो. काँग्रेसच्या या मोहिमेच्या विरोधात काय कायदेशीर कारवाई करता येईल, त्याचा विचार आम्ही करणार आहोत, असे भाजप नेते आणि गृहमंत्री अमित शाह यांनी बुधवारी (दि.१८) पत्रकार परिषदेत सांगितले. काँग्रेसने बाबासाहेबांना भारतरत्न पुरस्कार दिला नाही. काँग्रेसने आपल्याच नेत्यांना भारतरत्न दिला. काँग्रेस सरकार असताना बाबासाहेबांचे मोठे स्मारक झाले नाही, असे अमित शाह यांनी सांगितले.

### एलिफंटाच्या दिशेने जाणाऱ्या बोटीला नौदलाच्या बोटीची धडक

# समुद्रात बोट बुडून १३ जणांचा मृत्यू

## ■ मुंबईजवळ दुर्घटना; १०१ जणांना वाचवले



**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईमधून एलिफंटाकडे जाणारी एक प्रवासी बोट बुधवारी (दि.१८) सायंकाळी बुडाल्याची दुर्घटना घडली. या घटनेत तब्बल १३ जणांचा मृत्यू झाला आहे. या मृतांमध्ये तीन नौदल कर्मचाऱ्यांचाही समावेश आहे. तसेच या बोटमधून १०१ प्रवाशांना सुरक्षित बाहेर काढण्यात आले असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. बचावकार्यात सुरूच आहे. त्यामुळे सविस्तर माहिती उद्यापर्यंत प्राप्त होईल, असे माध्यमांशी बोलताना त्यांनी सांगितले.

मुंबईवरून एलिफंटाकडे नीलकमल ही बोट जात होत, मात्र या बोटीला गेट ऑफ इंडियाजवळ ही बोट बुडाल्याची घटना घडली. या बोटेतून १०० पेक्षा जास्त प्रवाशी प्रवास करत होते. ही दुर्घटना घडल्यानंतर लगेचच तातडीने मदतकार्य करण्यात आले. यावेळी नौदलाने या बोटीमधील १०१ प्रवाशांना सुरक्षित वाचवले. तर या घटनेत १३ जणांचा मृत्यू झाला आहे. तसेच अद्यापही नौदलाकडून आणि पोलिसांच्या समन्वयाने बचाव कार्य करण्यात येत आहे. यामध्ये चार नौदलाचे हेलिकॉप्टर, ११ नौदल क्राफ्ट आणि एक तटरक्षक दलाची नौका आणि तीन सागरी पोलीस नौका बचावकार्य करत असल्याची माहिती देण्यात आली आहे.

नौदलाचे व्हाईस डमिरल संजय जगजित सिंग यांनी दिलेल्या माहितीनुसार, नौदलाच्या डॉक्टरांनी सायंकाळी ७.३० पर्यंत १३ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. यात तीन नौदलाचे जवान असून १० नागरिक आहेत. दोन गंभीर जखमींना नौदल रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

**मृतांच्या वारसांना पाच लाखांची मदत**

मृतांच्या वारसांना मुख्यमंत्री सहायता निधीतून पाच लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात येईल. या घटनेची नौदल आणि राज्य सरकारमार्फत चौकशी केली जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एक्सवरील (ट्विटर) पोस्टमध्ये म्हटलं आहे.

**प्रत्यक्षदर्शीने सांगितले...**

बोट पाच ते सात किमी समुद्रात होती. त्यावेळी मी बोटीच्या डेकवर उभा होतो. एक स्पीड बोट आमच्या आजूबाजूला फिरत होती. ही स्पीडबोट भरधाव वेगाने आली आणि आमच्या बोटीला जोरात धडकली. त्यावेळी स्पीडबोटमधल्या काही प्रवाशांचा मृत्यू झाला. आमच्या बोटीत पाणी शिरू लागले आणि बोट बुडू लागली, अशी माहिती प्रत्यक्षदर्शी प्रवाशाने दिली आहे.

## 'नैना'साठी शेतकऱ्यांच्या घरांवर कोणतीही तोडक कारवाई करू नका

### आमदार महेश बालदी यांची हिवाळी अधिवेशनात मागणी

**नागपूर : रामप्रहर वृत्त**

तिसऱ्या मुंबईच्या अनुषंगाने नैना प्रकल्प विकासाच्या दृष्टिकोनातून गेमचेंजर होऊ शकतो, मात्र त्यासाठी सिडकोने शेतकरी आणि लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊन पुढील पाऊल उचलावे, त्याचबरोबर शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या नोटिसा तत्काळ थांबवाव्यात तसेच शेतकऱ्यांच्या घरांवर कोणतीही तोडक कारवाई होऊ नये, अशी आग्रही मागणी उरण विधानसभा मतदार संघाचे आमदार महेश बालदी यांनी नागपूर येथे सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनात औचित्याच्या मुद्याद्वारे केली.

नैना प्रकल्प संदर्भात शेतकऱ्यांना न्याय मिळालाच पाहिजे अशी आग्रही भूमिका यापूर्वीच मांडण्यात आली आहे. त्या अनुषंगाने विधिमंडळात बोलताना आमदार महेश बालदी यांनी म्हटले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या स्वप्नात असलेली तिसरी मुंबई वसण्याचा उद्देश आहे. नैना हा सुंदर प्रकल्प आहे. तिसऱ्या मुंबईचा कंजेक्शन व अनधिकृत बांधकामांना



या प्रकल्पातून अटकाव होईल, मात्र सिडको शेतकऱ्यांना घाबरण्याचे काम जास्त करत आहे आणि प्रत्यक्ष रुपी काम कमी करत आहे. सिडकोचे विद्यमान व्यवस्थापकीय संचालक यांनी आजपर्यंत या संदर्भात लोकप्रतिनिधींसोबत एकही बैठक घेतली नाही. उलट ५०३८ घरांना तोडक नोटीस दिल्या आहेत. स्थानिक भूमिपुत्रांनी बनवलेले हॉटेल धाबे कशाप्रकारे तुटणार आहेत त्याचे व्हिडीओ विरोधकांनी निवडणुकीत प्रचाराचा मुद्दा करून वायरल केला.

हा प्रकल्प शेतकऱ्यांना विकसित ४० टक्के जागा मिळणारा आहे, पण प्रशासकीय हलगर्जीपणामुळे हा प्रकल्प लांब चालला आहे. या प्रकल्पाच्या दृष्टिकोनातून पायाभूत सुविधांची करायच्या कामांची विचारणा शेतकऱ्यांना नैना प्राधिकरणाने केली नाही. नवीन युडीसीपीआरप्रमाणे काय सुविधा देण्यात येणार आहेत त्याची माहिती दिली पाहिजे. विरोधाला विरोध करणारी लोकं वेगळी आहेत. पण हा प्रकल्प व्हावा अशी इच्छा असली तरी त्याच्या बदल्यात शेतकऱ्यांना काय मिळणार आहे.

शेतकरी बिनघराचा होणार नाही हा विश्वास जेव्हा सिडको पटवून देईल तेव्हाच हा प्रकल्प पुढे जाणार आहे, असेही आमदार महेश बालदी यांनी अधोरेखित करत सिडकोने शेतकरी आणि लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊन पुढील पाऊल उचलावे, त्याचबरोबर शेतकऱ्यांना येणाऱ्या नोटिसा तात्काळ थांबवाव्यात तसेच घरांवर कोणतीही तोडक कारवाई होऊ नये, अशी मागणीही आमदार महेश बालदी यांनी औचित्याच्या मुद्यातून मांडली.

## निवडक

### द्रुतगती मार्गावर वाहनाच्या धडकेत बिबट्याचा मृत्यू

**लोणावळा :** मुंबई–पुणे द्रुतगती मार्गावर भरधाव वाहनाच्या धडकेत बिबट्याचा मृत्यू झाल्याची घटना मंगळवारी रात्री साडेअकराच्या सुमारास घडली. वाहनाच्या धडकेत मृत्यूमुखी पडलेला बिबट्या पूर्ण वाढ झालेला आहे. द्रुतगती मार्गावर वडगाव मावळ परिसरात भरधाव वाहनाने बिबट्याने धडक दिली.

### डॉ. सुधीर रसाळ यांना साहित्य अकादमी पुरस्कार

**छत्रपती संभाजीनगर :** मराठीतील अग्रणी समीक्षक डॉ. सुधीर रसाळ यांना विंदांचे गद्यरूप या समीक्षात्मक पुस्तकासाठी २०२४चा मानाचा साहित्य अकादमी पुरस्कार बुधवारी (दि.१८) जाहीर झाला आहे. मराठी भाषेचे शिक्षक व मराठी वाङ्मयात 'समीक्षेची प्रतिमासृष्टी' निर्माण करणारे तपस्वी डॉ. सुधीर रसाळ यांना हा पुरस्कार जाहीर होताच साहित्य क्षेत्रातून स्वागत करण्यात येत आहे.

## याला भेट, त्याला भेट, दुसऱ्या दिवशी घरी थेट!

### उपमुख्यमंत्री शिंदेंची उद्धव ठाकरेंवर टीका



**नागपूर : प्रतिनिधी**

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) प्रमुख उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि विधानसभेचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांची मंगळवारी भेट घेतली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या भेटीसत्राची खिल्ली उडवित 'आज याला भेट, त्याला भेट, दुसऱ्या दिवशी घरी थेट' अशी प्रतिक्रिया बुधवारी (दि.१८) विधानभवन परिसरात प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलताना दिली.

उद्धव ठाकरे मंगळवारी विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात सहभागी झाले. त्यांनी या वेळी मुख्यमंत्री फडणवीस आणि विधानसभा अध्यक्ष नार्वेकर यांची भेट घेतली. या भेटीदरम्यान विधानसभेचे विरोधी पक्षनेतेपद शिवसेनेला देण्यात यावे, अशी चर्चा झाल्याचे सांगण्यात येत आहे तसेच या भेटीनंतर उद्धव ठाकरे मुंबईला परत गेल्याची माहिती आहे.

या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, त्यांची कारस्थाने जगजाहीर आहेत. माजी मुख्यमंत्र्यांनी आजी मुख्यमंत्र्यांना भेटण्यात काहीही गैर नाही, मात्र आज याला भेट, त्याला भेट, दुसऱ्या दिवशी घरी थेट अशी ही स्थिती आहे.'

विधिमंडळाचे सभागृह हे जनतेचे प्रश्न मांडण्यासाठी आहे. सभागृहाबाहेर नौटंकी करण्यासाठी नाही. विरोधक पायऱ्यांवर बसून नौटंकी करतात. त्यातच त्यांना समाधान आहे, मात्र ते करण्याऐवजी त्यांनी सभागृहात येऊन लोकांचे प्रश्न मांडावे, असेही शिंदे म्हणाले.

## अश्विनची आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



गाबा कसोटीचा निकाल लागताच रविचंद्रन अश्विन याने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली. भारतीय क्रिकेट संघाचा खेळाडू म्हणून आजचा माझा शेवटचा दिवस असेल असे म्हणत अश्विनने निवृत्ती जाहीर करून सर्वांनाच धक्का दिला आहे. अश्विन हा भारतीय कसोटी इतिहासातील आतापर्यंतचा सर्वात यशस्वी फिरकीपटू ठरला आहे. गाबा कसोटीत पावसामुळे सामना थांबला होता, तेव्हा विराट कोहलीबरोबर बोलताना अश्विन खूप भावूक झालेला दिसला.

(सविस्तर पान ८ वर..)

## हिवाळी अधिवेशनात लोकप्रतिनिधी



**नागपूर :** विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात सर्वश्री आमदार प्रशांत ठाकूर, रविशेठ पाटील, महेश बालदी. सोबत माजी आमदार नरेंद्र पवार व इतर मान्यवर.

## लॉजिंगच्या नावाखाली देहविक्री व्यवसाय

### ■ अलिबाग येथून दोघांना अटक

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबागमधील चेंढरे येथे लॉजवर छापा टाकून तेथे देहविक्री व्यवसाय चालवणाऱ्या दोघांना रायगड पोलीस दलाच्या स्थानिक गुन्हे अन्वेशण विभागाने (एलसीबी) अटक केली आहे. दोघांवर अलिबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

चेंढरे परिसरात लॉजिंगच्या नावाखाली देहविक्री व्यवसाय सुरू असल्याची खबर स्थानिक गुन्हे शाखेला मिळाली होती. त्यानुसार विशेष पथकांची नेमणूक करून या लॉजवर बनावट ग्राहक पाठवण्यात आला. बनावट ग्राहकाच्या मदतीने ओयो कंपनीच्या नावाखाली सुरू असलेल्या या लॉजमध्ये देहविक्री व्यवसाय सुरू असल्याची खात्री पटताच, महिला पंचासह पोलिसांनी या लॉजवर धाड टाकली. पंचनामा करून लॉजचे मालक आणि त्यांची पत्नी या दोघांना ताब्यात घेण्यात आले.

या प्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, दोन्ही आरोपींना अलिबाग पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक बाळासाहेब खाडे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

अलिबागचे पोलीस निरीक्षक किशोर साळे, सहाय्यक निरीक्षक भास्कर जाधव, उपनिरीक्षक अनिल गोसावी, बांगलादेशी घुसखोर विरोधी पथकाचे तानाडी वाघमोडे, रसिका सुतार, सचिन शेलार, रूपेश निगडे, अक्षय पाटील, गणेश पारधी, सुजय मगर, अमर जोशी यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

## जीएसटी परिषदेत मंत्री आदिती तटकरे करणार राज्याचे प्रतिनिधीत्व



**नागपूर :** राजस्थानमधील जैसलमेर येथे होणाऱ्या डिसेंबर २०२४च्या जीएसटी परिषदेमध्ये मंत्री आदिती तटकरे या राज्याचे प्रतिनिधीत्व करणार आहेत. या परिषदेच्या पार्श्वभूमीवर मंत्री तटकरे यांनी विधानभवन येथे झालेल्या बैठकीमध्ये अधिकाऱ्यांकडून जीएसटीबाबत सविस्तर आढावा घेतला.

या बैठकीस राज्य कर आयुक्त आशिष शर्मा, विक्रीकर सह आयुक्त किरण शिंदे, विक्रीकर उपायुक्त नंदकुमार दिघे आदी उपस्थित होते. जैसलमेर येथे २० व २१ डिसेंबर २०२४ असे दोन दिवस ही जीएसटी परिषद होणार आहे तसेच या परिषदेवेळी अर्थसंकल्पाविषयीही बैठक होणार आहे. यामध्ये राज्यांच्या अर्थसंकल्पाकडून असणाऱ्या अपेक्षांची चर्चा करण्यात येणार आहे.




# अधिक सक्षम होण्यासाठी एआय तंत्रज्ञान समजून घेणे गरजेचे -प्रधान सचिव ब्रिजेश सिंह

◆ नागपूर प्रेस क्लब येथे पत्रकारांसाठी विशेष व्याख्यान

◆ आपली पत्रकारिता 'रिअलटाईम' करण्यासाठी 'एआय' उपयुक्त

**नागपूर : प्रतिनिधी**

माध्यमात कार्यरत असलेल्या प्रत्येक व्यक्तिला अधिक माहिती सक्षम होण्याचा मार्ग कृत्रिम बुद्धिमत्तेने म्हणजेच 'एआय' ने उपलब्ध करून दिला आहे. आपल्या मातृभाषेतून मिळणाऱ्या ज्ञानाला ज्या मर्यादा होत्या, त्या मर्यादा आता 'एआय' च्या माध्यमातून कमी झाल्या आहेत. ज्या भाषेत आपल्याला माहिती हवी आहे, त्या भाषेत ती सहजरित्या उपलब्ध होते. त्यामुळे कृत्रिम बुद्धिमत्तेपासून दूर राहण्याऐवजी तंत्रज्ञान समजून घेणे आणि आपल्या वापरातून ते अधिक परिपूर्ण करण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे, असे प्रतिपादन माहिती व जनसंपर्क विभागाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह यांनी केले.




नागपूर प्रेस क्लब आणि माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या संचालक नागपूर कार्यालयाच्या वतीने 'आर्टिफिशल इंटेलिजन्स इन जर्नालिझम' (कृत्रिम बुद्धिमत्ता आणि पत्रकारिता) या विषयावर आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

ज्येष्ठ पत्रकार तथा माजी राज्य माहिती आयुक्त राहुल पांडे अध्यक्षस्थानी होते. कार्यक्रमास नागपूर प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रदीप मैत्र, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे नागपूर – अमरावती विभागाचे संचालक डॉ. गणेश मुळे, माहिती संचालक किशोर गांगुर्डे, दयानंद कांबळे उपस्थित होते.

ब्रिजेश सिंह म्हणाले, कोणतेही नवीन तंत्रज्ञान आले की नोकऱ्या कमी होतील, अशी एक भीती व्यक्त होत असते. मात्र तंत्रज्ञानातून नवनवीन संधी निर्माण झाल्याची प्रचिती आपण आजवर घेत आलो आहोत. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या बाबतीतही अशीच भीती व्यक्त केली जात आहे. वास्तविक याचा परिपूर्ण वापर जर करता आला नाही, तर संबंधितांना आपल्या नोक–या गमाविण्याची भीती अधिक आहे. हे माध्यम वापरतांना मात्र प्रत्येकाला अगोदर स्वत:ला सिध्द करावे लागेल. एआयच्या माध्यमातून जी काही माहिती आपल्यासमोर येईल, त्या माहितीला अधिक पडताळून घेणे, त्यात असलेल्या त्रृट्या दुरूस्त करून अधिक परिपूर्ण करणे, अशा माहितीला नैतिक व संवैधानिक दृष्टीने पडताळून पाहणे व दक्ष राहून चुका दुरुस्त करणे, याचे भान प्रत्येकाने ठेवले पाहिजे, असा इशाराही त्यांनी यावेळी बोलतांना दिला.

आज विविध समाजमाध्यमांचा लोकांवर प्रचंड प्रभाव आहे. यात अनेक धोके आहेत. एखादी व्यक्ती गाफील राहून आपल्या मोबाईलवर आलेल्या चुकीच्या संदेशाला बळी पडला तर त्याला आर्थिक फसवणुकीलाही तोंड द्यावे लागते, याची अनेक उदाहरणे आहेत. यातील भीती बाजुला सारून आपण दक्ष असायला हवे. इतर प्राणीमात्रांबद्दल व्यक्ती म्हणून, माणूस म्हणून ज्या मानवतेच्या दृष्टीने आपण त्यांना पाहतो, त्याच दृष्टीमध्ये संवैधानिक व सत्य–असत्य या परिभाषेत सावध होत 'एआय' ला आपण जवळ केले पाहिजे. कोणतीही उत्सुकता ही ज्ञानाच्या स्त्रोतांपर्यंत आपल्याला घेऊन जात असते. पुर्वी या उत्सुकतेला आपण गुगलची जोड देऊन समाधान करून घेतले. आता या उत्सुकतेचे अधिक पुढचे पाऊल म्हणून एआय मार्फत मिळणा–या माहितीकडे पाहावे लागेल, असे त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय भाषणात माजी राज्य माहिती आयुक्त राहुल पांडे म्हणाले, आपल्यामध्ये मुळात असलेल्या गुणवत्तेसोबतच कृत्रीम बुध्दीमत्तेचा योग्य वापर करणे गरजेचे आहे. भारत विरोधी कृत्य करण्यासाठी एआय चा वापर होणार नाही, यासाठी एआय ची माहिती भारतीय पध्दतीने तयार करणे आवश्यक आहे. मराठी भाषेलासुध्दा एआय शी जोडावे लागणार आहे. तसेच अशा कार्यशाळांचे अधिकाधिक आयोजन व्हावे, अशी अपेक्षाही राहुल पांडे यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक नागपूर प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रदीप मैत्र यांनी केले. संचालन माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे संचालक डॉ. गणेश मुळे यांनी तर आभार माहिती संचालक दयानंद कांबळे यांनी मानले. कार्यक्रमाला ज्येष्ठ पत्रकार बाळ कुलकर्णी, धमेंद्र झोरे, भुपेंद्र गणवीर यांच्यासह विविध माध्यमातील पत्रकार, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे अधिकारी उपस्थित होते. तसेच राज्यातील जिल्हा माहिती कार्यालये आणि विविध पत्रकारिता संस्थांनी ऑनलाईन पध्दतीने व्याख्यानाचा लाभ घेतला.

## जातीवाचक शिवीगाळ व धमकी दिल्याप्रकरणी पाच जणांवर अँट्रॉसिटी दाखल

**माणगाव : प्रतिनिधी**

मागासवर्गीय समाजाचे असल्याचे माहित असतानाही जातीवाचक शिवीगाळ केल्याप्रकरणी माणगाव तालुक्यातील हिरालाल महादेव मेथा हायस्कुल विळेचे मुख्याध्यापक व संस्था चालकांसह एकुण पाच आरोपींवर माणगाव पोलीस ठाण्यात अँट्रॉसिटी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

माणगाव पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की, घटनेची खबर देणारे परशुराम हरिश्चंद्र आंबेतकर हे मागासवर्गीय हिंदु चांभार समाजाचे असल्याचे माहित असुन देखील आरोपी हिराबाई महादेव मेथा हायस्कुलचे मुख्याध्यापक राजेंद्र अमरनाथ ठाकूर,संस्थापक सुभाष हिरालाल मेथा,हायस्कुलचे सदस्य महादेव ताम्हणकर,हायस्कुलचे सदस्य तानाजी भोकर,विद्या नलावडे सर्व रा. विळा यांनी जातीवाचक शिवीगाळी केली व आरोपी राजेंद्र ठाकूर यांनी खबर देणार यांची पत्नी हिला हाताने धक्का देऊन खाली पाडले व हातात दगड घेवुन ठार मारीन अशी धमकी दिली.




त्यावेळी खबर देणार यांस बीपीचा त्रास होवु लागल्याने ते शाळेत पाणी पिण्यास गेले असता आरोपींनी त्यांना शाळेचे पाणी पिण्यास विरोध केला. तसेच आरोपी विद्या नलावडे यांनी खबर देणार यांस झोडपते, अशी धमकी दिली.

सदरची घटना दि.३१ जानेवारी ते दि.१० मे २०२४ दरम्यान घडली. याबाबतची फिर्याद परशुराम हरिश्चंद्र आंबेतकर (वय – ५१ ) रा.रोहिदासनगर विळे ता.माणगाव यांनी माणगाव पोलीस ठाण्यात दि.१७ डिसेंबर २०२४ रोजी उशिरा दिली .या गुन्ह्या प्रकरणी वरील पाच आरोपींवर माणगाव पोलीस ठाण्यात कॉ. गु.रजि.नं. ३००/२०२४ भादवी संहिता कलम ३५४,३२३,५०४,५०६,३४ अनुसूचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंध अधि कलम ३ (१),(आर),(एस),३ (१) (डब्लू ),(१),(१),३ (२),५ (ऐ)प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर घटनेचा अधिक तपास माणगाव तालुक्याचे उपविभागीय पोलीस अधिकारी पुष्कराज सूर्यवंशी करीत आहेत.

## आगरी दर्पण दिनदर्शिकेचे प्रकाशन

**डोंबिवली : प्रतिनिधी**

अखिल आगरी समाज परिषदेचे मुखपत्र असलेल्या आगरी दर्पण मासिकाच्या आगरी दर्पण दिनदर्शिका २०२५चे प्रकाशन आगरी महोत्सव डोंबिवली येथे समाज नेते माजी मंत्री जगन्नाथ पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमाला आगरी युथ फोरमचे अध्यक्ष गुलाब वझे, 'आगरी दर्पण'चे संपादक दीपक म्हात्रे, कार्यकारी संपादक जे.डी. तांडेल, सहव्यवस्थापक डी.बी. पाटील, आगरी युथ फोरमचे सरचिटणीस रामकृष्ण पाटील, उपाध्यक्ष विश्वनाथ रसाळ, कार्याध्यक्ष जालिंदर पाटील, चिटणीस प्रकाश भंडारे, खजिनदार पांडुरंग म्हात्रे आणि आगरी महोत्सवाचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

या वेळी माजी मंत्री जगन्नाथ पाटील यांनी आगरी दर्पण दिनदर्शिकेचे कौतुक करून गेली २५ वर्षे ही दिनदर्शिका प्रकाशित करण्यात येत असल्याने संपादक दीपक म्हात्रे यांना धन्यवाद दिले. संपूर्ण बहुरंगी असलेल्या या दिनदर्शिकेत संपूर्ण वर्षाचे पंचांग,तिथी, थोरामोठ्यांच्या पुण्यतिथी, संतांच्या जयंत्या, सणवार, राष्ट्रीय सण अशी बरीच माहिती देण्यात आली आहे. त्यामुळे ही दिनदर्शिका संग्राह्य झाली आहे. आगरी दर्पणच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन प्रतिवर्षी या आगरी महोत्सवात करण्यात येत असल्याचे सांगून आगरी युथ फोरमचे अध्यक्ष गुलाब वझे यांनी प्रकाशकांना धन्यवाद दिले.



## मध्य रेल्वे कुंभमेळा–२०२५साठी ३४ विशेष गाड्या चालवणार

**रोहे : प्रतिनिधी**

मध्य रेल्वे दि. १३.०१.२०२५ ते दि. २६.०२.२०२५ या कालावधीत प्रयागराज येथे होणाऱ्या कुंभमेळा २०२५ दरम्यान प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेऊन छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस/पुणे – मऊ आणि नागपूर–दानापूर दरम्यान ३४ विशेष गाड्या चालवणार आहे.

**१) छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस – मऊ कुंभमेळा विशेष (१४ सेवा)**

गाडी क्रमांक ०१०३३ कुंभमेळा विशेष दि. ०९.०१.२०२५, १७.०१.२०२५, २२.०१.२०२५, २५.०१.२०२५, ०५.०२.२०२५, २२.०२.२०२५ आणि २६.०२.२०२५ रोजी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून सकाळी ११.३० वाजता सुटेल आणि मऊ येथे दुसऱ्या दिवशी २२.०० वाजता पोहोचेल. (७ सेवा) गाडी क्रमांक ०१०३४ कुंभमेळा विशेष दि. १०.०१.२०२५, १८.०१.२०२५, २३.०१.२०२५, २६.०१.२०२५, ०६.०२.२०२५, २३.०२.२०२५ आणि २७.०२.२०२५ रोजी मऊ येथून २३.५० वाजता सुटेल आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे दुसऱ्या दिवशी १४.३० वाजता पोहोचेल. (७ सेवा)

या गाडील दादर, ठाणे, कल्याण, इगतपुरी, नाशिकरोड, मनमाड, जळगाव, भुसावळ, खांडवा, तलवारिया, चनेरा, खिरकिया, हरदा, बानापुरा, इटारसी, पिपरिया, नरसिंगपूर, जबलपूर, कटनी, मैहर, सतना, माणिकपूर, प्रयागराज, चक्की मिर्झापूर, चुनार, वाराणसी, शहागंज आणि आझमगड हे थांबे देण्यात आले आहेत.

**२) पुणे – मऊ कुंभमेळा विशेष (१२ सेवा)**

गाडी क्रमांक ०१४५५ कुंभमेळा विशेष पुणे येथून दि. ०८.०१.२०२५, १६.०१.२०२५, २४.०१.२०२५, ०६.०२.२०२५, ०८.०२.२०२५ आणि २१.०२.२०२५ रोजी सकाळी १०.१० वाजता सुटेल आणि २१.०२.२०२५ रोजी मऊ येथे दुसऱ्या दिवशी पोहोचेल. (६ सेवा)

गाडी क्रमांक ०१४५६ कुंभमेळा विशेष ०९.०१.२०२५, १७.०१.२०२५, २५.०१.२०२५, ०७.०२.२०२५, ०९.०२.२०२५ आणि २२.०२.२०२५ आणि २२.०२.२०२५ रोजी मऊ येथून २३.५० वाजता सुटेल आणि पुणे येथे दुसऱ्या दिवशी १६.४५ वाजता पोहोचेल. (६ सेवा)

गाडीला थांबे दौंड चौर्ड लाईन, अहमदनगर, बेलापूर, मनमाड, जळगाव, भुसावळ, खंडवा, तलवाडिया छनेरा, खिरकिया, हरदा, बानापुरा, इटारसी, पिपरिया, नरसिंगपूर, जबलपूर, कटनी, मैहर, सतना, माणिकपूर, प्रयागराज, छिवकी, मिर्झापूर , वाराणसी, शहागंज आणि आझमगड हे थांबे देण्यात आले आहेत.

**३) नागपूर – दानापूर कुंभमेळा विशेष (८ सेवा)**

गाडी क्रमांक ०१२१७ कुंभमेळा विशेष २६.०१.२०२५, ०५.०२.२०२५, ०९.०२.२०२५ आणि २३.०२.२०२५ रोजी नागपूर येथून सकाळी १०.१० वाजता सुटेल आणि दानापूर येथे दुसऱ्या दिवशी ११.०० वाजता पोहोचेल. (४ सेवा)

गाडी क्रमांक ०१२१८ कुंभमेळा विशेष दि. २७.०१.२०२५, ०६.०२.२०२५, १०.०२.२०२५ आणि दि. २४.०२.२०२५ रोजी दानापूर येथून सकाळी १६.०० वाजता सुटेल आणि नागपूर येथे दुसऱ्या दिवशी १९.३० वाजता पोहोचेल. (४ सेवा)

या गाडीला नरखेड, आमला, बैतुल, इटारसी, पिपरिया, नरसिंगपूर, जबलपूर, कटनी, मैहर, सतना, माणिकपूर, प्रयागराज छिवकी, मिर्झापूर, चुनार, पं. दीनदयाल उपाध्याय जंक्शन, बक्सर आणि आरा.हे थांबे देण्यात आले आहेत.

या गाड्यांचे आरक्षण कुंभमेळा विशेष ट्रेन क्रमांक ०१०३३, ०१४५५ आणि ०१२१७ साठी विशेष शुल्कासह बुकिंग दि. २०.१२.२०२४ रोजी सर्व पीआरएस केंद्रांवर आणि www.irctc.co.in या संकेस्थळावर सुरू होईल. या विशेष गाड्यांमध्ये, सामान्य द्वितीय श्रेणीचे डबे अनारक्षित डबे म्हणून चालतील आणि तिकीट यूटीएसद्वारे बुक केले जाऊ शकतात. या विशेष गाड्यांच्या तपशीलवार वेळा आणि थांब्यासाठी, कृपया www.enquiry.indianrail.gov.in ला भेट द्या किंवा छ्ढएड प डाउनलोड करा.असे आवाहन मध्य रेल्वे कडुन करण्यात आले आहे.

## हाकेला धावणारी, नवसाला पावणारी, श्रीवर्धनची माता सोमजाई

### सोमजाई देवीचा रथोत्सव – एक धार्मिक उत्सव

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन तालुक्याच्या धार्मिक परंपरेत प्रत्येक वर्षी मोठ्या उत्साहात साजरा होणारा श्री सोमजाई देवीचा रथोत्सव एक विशेष स्थान राखतो. प्लेगच्या साथीनंतर शके १७९९ मध्ये श्रीवर्धनमध्ये रथोत्सवाच्या प्रारंभ झाला. यंदा श्री सोमजाई देवीचा रथोत्सव प्रारंभ१६ डिसेंबर २०२४ रोजी झाला आहे, जो २४ डिसेंबर २०२४ पर्यंत चालेल.

श्री सोमजाई देवस्थान, जे दक्षिण काशी सोमजाई म्हणून प्रसिद्ध आहे, त्याची स्थापना महामुनी श्री अगस्त मुनीने केली आहे. या देवस्थानी चार शिवशक्ती – कंकाळी, भद्रकाली, कालायनी आणि चामुंडा यांच्या शक्तीप्रदर्शनाने भक्तांना पुण्यप्राप्ती होण्याची संधी मिळते. मुख्य देवता, श्री सोमजाई देवी, शाळिग्राम रूपात भक्तांचे कल्याण करणारी आहे.



रथोत्सवाच्या दरम्यान काकड आरती आणि भजनांची धार्मिक ध्वनिपूर्वक पूजा होते. या सोहळ्यात सर्व भक्त भक्तिभावाने सहभागी होतात, आणि विविध धार्मिक कार्य पार पडतात. श्री सोमजाई देवीच्या रथोत्सवामुळे देवस्थानाची महिमा वाढतो, आणि भक्तांना देवीच्या कृपेचा अनुभव घेता येतो.

यावर्षी, रथयात्रेला सकाळी ८ वाजता प्रारंभ होईल आणि मंगळवारी, २४ डिसेंबर रोजी दुपारी १२ वाजता रथयात्रेची सांगता होईल. या उत्सवामध्ये सर्पदंश किंवा अन्य प्रकारच्या विषबाधांनी त्रस्त असलेल्या प्राण्यांच्या उपचारासाठी श्री सोमजाई देवीच्या मंदिरात श्रद्धापूर्वक विश्वास ठेवावा आणि तीर्थक्षेत्रात पूजेसह प्रार्थना करावी. श्रीवर्धनच्या भक्तांसाठी हा रथोत्सव एक अतिशय महत्त्वपूर्ण धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रम आहे, ज्यामुळे संपूर्ण गावात भक्तीचे वातावरण निर्माण होते.

**◆ श्रीवर्धन वरील धर्मनिष्ठा आणि माता सोमजाईची महिमा**

*श्री सोमजाई देवी हाकेला धावणारी, नवसाला पावणारी जागृत माता म्हणून प्रसिद्ध आहे. तिच्या कृपेने प्रत्येक भक्ताच्या जीवनात चमत्कारीक परिवर्तन घडते. दिव्य शक्तींनी युक्त असलेल्या या देवतेवर श्रद्धा ठेऊन भक्त आपल्या सर्व इच्छांना पूर्ण करणार्या मातेसमोर प्रार्थना करतात*

## शाळेजवळील रस्त्यावर गतिरोधक बसविण्याची भाजपची मागणी

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड जंजिरा नगरपरिषद शिक्षण मंडळाची शाळा क्रमांक ४ मारुती नाका येथील मुख्य रस्त्यावर असल्याने या रस्त्यावरून रोज शेकडो गाड्या अतिवेगाने धावत असतात त्यामुळे शाळेच्या समोरील रस्त्यावर गतीरोधक बसवा, अशी मागणी भारतीय जनता पक्षाचे शहर प्रमुख महेश मानकर यांनी मुरूड जंजिरा नगरपरिषद मुख्याधिकारी यांच्याकडे रितसर निवेदन देऊन केली आहे.

या शाळेजवळील रस्त्यावर पुर्वी या ठिकाणी दोन बाजुला गतीरोधक होते, परंतु नव्याने रस्ता झाल्याने या ठिकाणी गतीरोधक बसविले गेले नाही.यामुळे वाहन चालक या रस्त्यावरून ७० ते ८० च्या वेगाने चालक वाहने चालवत असतात. त्यामुळे नगर परिषद शाळा क्रमांक ४ मधील विद्यार्थ्यांचा सुरक्षेच्या प्रश्न निर्माण झाला आहे.या शाळेत पहिली ते सातवीचे विद्यार्थी या शाळेत शिक्षण घेत आहेत.जर चुकुन विद्यार्थी खेळता खेळता गेट मधुन बाहेर आला आणि या ठिकाणी मोठा अपघात झाला तर याला जबाबदार कोण?

या गाड्यांच्या वेगाने पालक वर्ग ही घाबरून आसतात. तरी प्रशासनाने विद्यार्थाच्या सुरक्षेसाठी शाळेच्या गेट समोरील रस्त्यावर दोन्ही बाजुंना त्वरित गतीरोधक बसवुन विद्यार्थीची सुरक्षा करा अशी मागणी मुरुड भाजप पक्षाचे शहर प्रमुख महेश मानकर यांनी केली आहे.




## दुखवटा

### हेमंत मेथा




**माणगाव** : येथील प्रसिद्ध व्यापारी तथा रोटरी क्लबचे माजी अध्यक्ष हेमंत (बंड्या) पितांबर मेथा (वय ६४) यांचे बुधवारी (दि.१८) माणगाव येथे निधन झाले. अंत्यविधीला मोठा जनसमुदाय उपस्थित होता. कै. हेमंत मेथा यांच्या पश्चात आई–वडील, पत्नी, दोन भाऊ, एक बहिण, एक मुलगा, एक मुलगी, नात असा परिवार आहे.

### जनार्दन परांजपे



**कर्जत :** कर्जतमधील जनार्दन परांजपे (वय ७७) यांचे मंगळवारी (दि.१७) निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी आणि मुलगा असा परिवार आहे. कर्जतमधील अभिनव ज्ञान मंदिर या शाळेत अनेक वर्षे त्यांनी ज्ञान दानाचे पवित्र काम त्यांनी केले होते. श्री छत्रपती शिवाजी मंडळ, श्री धापया देवस्थान, श्री साई मंडळ कर्जत या संस्थेचे पदाधिकारी, सदस्य होते. त्यांना आदर्श शिक्षक पुरस्कार, गुणवंत नागरिक पुरस्कार, शिक्षक रत्न पुरस्काराने सन्मानित केले होते.

### जयश्री किलंजे



**नागोठणे :** नागोठणे केएमजी विभागातील सामाजिक कार्यकर्ते आबु किलंजे व सुरेश किलंजे यांच्या मातोश्री कै. जयश्री नथुराम किलंजे यांचे वयाच्या ७५ व्या वर्षी रविवार दि. १५ डिसेंबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात आबु व सुरेश हे दोन मुले, मनिषा रामदास खेडेकर व वैशाली संजय रिकामे ह्या दोन मुली, सुना, जावई, एक नातू व आठ नाती असा मोठा परिवार आहे.

## निवडक

### चार वाहनांचा विचित्र अपघात



**पनवेल :** खांदा वसाहतीमध्ये मंगळवारी रात्री चार वाहनांमध्ये झालेल्या विचित्र अपघातात वाहनांचे मोठे नुकसान झाले आहे. खांदा वसाहत ते खांदेश्वर रेल्वे स्टेशनकडे जाणार्या रस्त्यावर अज्ञात कारणावरून तीन ते चार वाहनांना धडक देवून एक ट्रक पळून पुढे जात असताना दुभाजकाला धडकून तो पलीकडे आडवा झाला. या घटनेची माहिती मिळताच परिसरातील जागृत नागरिक मदतीला धावले व त्यांनी पोलिसांशी संपर्क साधला. या अपघातात वाहनांचे मोठे नुकसान झाले आहे.

### आदीवासीवाडीत स्वच्छता जनजागृती

मोहोपाडा : रसायनी पाताळगंगा औद्योगिक परिसरातील पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट, पिल्लई एचओसी कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय मोहोपाडा रसायनी, ग्रुप ग्राम पंचायत माजगाव यांच्या संयुक्त विद्यमानाने माजगाव आदिवासी वाडी व पौध आदिवासी वाडी येथे स्वच्छताचे महत्त्व सांगून परिसरात साफसफाई करण्यात आली. आदीवासी वाड्यात प्लास्टिक बंदी जनजागृती म्हणून कापडी बॅग वाटप करण्यात आल्या. या वेळी नरेश पाटील,अरुण गोविंद जाधव अध्यक्ष पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट, शिक्षिका कलावती उपाध्याय, शिक्षिका ऋतुजा कोंडाळकर, राष्ट्रीय सेवा योजना (NSS)चे पिल्लई कॉलेज आदींसह मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.



# दिघोडे-दास्तानफाटा रस्त्यावरील झाडे उद्ध्वस्त

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील दिघोडे-दास्तानफाटा रस्त्यावर एम आयडीसीची जलवाहिनी साकारण्याच्या नावाखाली खुलेआम शेकडो वृक्षे पोकलन यंत्राने उद्ध्वस्त करण्यात येत आहेत.

सतत वाहनांची वर्दळ असलेल्या या दिघोडे-दास्तानफाटा रस्त्यावर दादरपाडा नाजिक असलेल्या रस्त्यावर पोकलन यंत्राने वृक्षे उध्वस्त करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. ही झाडे मुळासकट उपटून त्यांचे अस्तित्व नष्ट करण्यात येत आहे.

भर दिवसा वर्षानुवर्षे अतिशय मेहनतीने लागवड करून वाढविण्यात आलेली ही दिघोडे-दास्तानफाटा रस्त्यावरील वृक्षे पोकलन यंत्राने राजरोसपणे उध्वस्त करून आजूबाजूला फेकली जात आहेत. याचे गांभीर्य वन विभागाने घेऊन संबंधितावर कारवाई करून वृक्षे उद्ध्वस्त करण्याचे काम तत्काळ बंद करण्याची मागणी विविध स्तरातून करण्यात येत आहे.

> वृक्षतोडीच्या तक्रारी तर आम्हाला प्राप्त झालेल्या नाहीत, मात्र आमच्या निदर्शनास जर कोणी वृक्षतोड किंवा उद्ध्वस्त करीत असल्याचे आढळल्यास संबंधितावर १९६४च्या कायदा कलम अंतर्गत कारवाई करण्यात येईल.
>
> **-एन.जी.कोकरे,** तालूका वनक्षेत्र अधिकारी उरण



## खरेदीच्या बहाण्याने ज्वेलर्समध्ये तीन महिलांनी लाखोंचे दागिने चोरले

**पनवेल : वार्ताहर**

दागिने खरेदी करण्याच्या बहाण्याने पनवेल मधील एच.एम.ज्वेलर्स या दुकानात गेलेल्या तीन महिलांनी ज्वेलर्स दुकानातील कामगारांची नजर चुकवून ज्वेलर्स दुकानातील पावणे दोन लाख रुपये किंमतीची सोन्याची फुली (चमकी) चोरून नेल्याची घटना उघडकिस आली आहे. पनवेल शहर पोलिसांनी या घटनेतील तीन चोरटया महिलांविरोधात गुन्हा दाखल करुन त्यांचा शोध सुरु केला आहे.

पनवेल मधील जोशी आळीमध्ये हितेश पटेल यांचे एच.एम.पटेल ज्वेलर्स नावाचे ज्वेलर्सचे दुकान आहे. तीन महिला या दुकानात दागिने खरेदी करण्याच्या बहाण्याने गेल्या होत्या. यावेळी सदर महिलांनी नाकात परिधान करण्यासाठी असलेली सोन्याची फुली (चमकी) पहाण्याचा बहाणा केला. त्यानंतर सदर महिलांनी दुकानातील कर्मचार्यांना बोलण्यात गुंतवून ठेवले. त्यानंतर त्यांची नजर चुकवून हातचलाखीने दुकानातील बॉक्समधील २४.३०० ग्रॅम वजनाची एक लाख ८५ हजार रुपये किंमतीची महीलांच्या नाकात परिधान करण्यासाठी असलेली सोन्याची फुली (चमकी) चोरली. त्यानंतर सदर महिलांनी दुकानातून काढता पाय घेतला.

रात्री दुकान बंद करण्यापुर्वी ज्वेलर्स दुकानातील कर्मचाऱ्यांनी सर्व दागिन्यांची मोजणी केली असता, त्यांना सोन्याचे लहान दागिने खरेदी विक्री झालेल्या व्यवहारापेक्षा कमी असल्याचे आढळुन आले. त्यामुळे दुकान मालकाने दुकानातील सीसीटीव्ही कॅमेऱ्याची पाहणी केली असता, दागिने खरेदी करण्याच्या बहाण्याने त्यांच्या दुकानात सकाळी आलेल्या तीन महिलांनी सोन्याची फुली चोरुन नेल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यानंतर दुकान मालकाने पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी तीन चोरट्या महिलांविरोधात गुन्हा दाखल करून त्यांचा शोध सुरू केला आहे.

गुन्हे

## सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलच्या विद्यार्थ्यांचे रोबोटीक्स स्पर्धेत घवघवीत यश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अमिटी इंटरनॅशनल स्कुल बेलापूर या ठिकाणी नॅशनल युथ रोबोटीक स्पर्धा आयोजित करण्यात आली होत्या. या स्पर्धामध्ये उलवे येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलमधील विद्यार्थ्यांनी सहभाग घेत घवघवीत यश संपादन केले आहे.

नॅशनल युथ रोबोटीक स्पर्धेमध्ये एकूण ३० शाळांनी सहभाग घेतला होता. सर्व विद्यार्थी प्रतिनिधीनी उत्कृष्ट असे वेगवेगळे सर्जनशील रोबोट प्रोजेक्ट तयार करून आणले होते. सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलमधील सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांनीदेखील सहभाग घेतला होता.



त्यामधील सातवीतील जय चेतन कुकरेजा, अखिल पंकज राणा व प्रत्यक्ष मितेश करिया या विद्यार्थ्यांच्या गटाने या स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकवला व त्यांची निवड ही राज्यस्तरीय रोबोटिक स्पर्धासाठी झालेली आहे.

या तिन्ही विद्यार्थ्यांना सिनियर सायंटिस्ट डॉ. मनोजजी शेमवाल यांच्या हस्ते गौरवण्यात आले. सोबत गूगल कंपनीचे डायरेक्टर लांबा सर यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## उरण महाविद्यालयाचे निवासी श्रमसंस्कार शिबिर





**उरण : रामप्रहर वृत्त**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष निवासी श्रमसंस्कार शिबिर खोपटे बांधपाडा, उरण येथे झाले.

युवक व माझा भारत युवक व डिजिटल साक्षरता ही शिबिराची मुख्य थिम होती. शिबिराचे उद्घाटन संस्थेचे मुख्यकार्यकारी अधिकारी प्रदीपचंद्र शृंगारपुरे यांच्या हस्ते झाले. त्यांनी विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबिर महत्त्वाचे असल्याचे सांगितले. महाविद्यालयाचे प्राचार्य के. ए. शामा यांनी यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमात मा. विशाल पाटेकर, आय क्यु ए सी समन्वयक डॉ.ए.आर. चव्हाण आदी उपस्थित होते. सबंध सात दिवसीय शिबिरात तलाव परिसर, स्मारक परिसर, तसेच शाळा परिसर स्वच्छ करण्यात आला. त्याचबरोबर स्वच्छता व पर्यावरणाचा संदेश देणारी प्रभात फेरी आयोजित करण्यात आली. गावाचे पर्यावरण तसेच महिला सक्षमीकरण इत्यादी विषयांवर कार्य करण्यात आले. शिबिरात विविध मान्यवरांनी विद्यार्थ्यांना संबोधित केले.

संजीवन म्हात्रे, जितेंद्र लाड, जयंत ठाकूर, दौलत पाटील, हितेंद्र घरत आदींनी विविध विषयांवर व्याख्याने दिली. समारोपीय कार्यक्रमात महाविद्यालय विकास समितीचे सदस्य रमेश ठाकूर यांनी विद्यार्थ्यांना संबोधित केले. राणी सुरज म्हात्रे व सायली सविन म्हात्रे ह्या प्रमुख पाहुण्या होत्या. प्राचार्य के.ए. शामा यांनी शिबिरात शिकलेली कौशल्य जीवनात उतरवावीत असे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आरती पाटीलने केले तर अहवाल वाचन प्राप्ती पांगुळ हिने केले.

स्वागत परिचय कुमारी नम्रता चव्हाण व सोहम जाधव यांनी केले. मनीषा मोहिते, शुभम जयस्वाल, भूमिका गुडेकर व भूमिका भोसले आदींनी आपली अनुभव कथन केले. संपूर्ण शिबिराचे आभार प्रदर्शन राष्ट्रीय योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. दत्ता हिंगमिरे यांनी केले.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात पारितोषिक वितरण समारंभ

**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातर्फे बुधवारी (दि.१८) वाणिज्य व विज्ञान शाखेत इयत्ता अकरावी व बारावीमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी वेगवेगळ्या स्पर्धांचे आयोजन केले होते व त्या विद्यार्थ्यांना रोख रकमेचे पारितोषिके देण्यासाठी या समारंभाचे आयोजन केले होते.

या स्पर्धा घेण्याचा प्रमुख उद्देश अकरावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना लेखन कौशल्य, सादरीकरण कौशल्ये, व्यावसायिक जाहिराती, फोटोग्राफी अशी वेगवेगळी कौशल्ये विकसित व्हावीत व त्यांना भविष्यात त्यांच्या करिअरसाठी फायदा व्हावा हा होता.



या स्पर्धेमध्ये प्रामुख्याने निबंध, ऍडमँड शो, रील मेकिंग व नेचर्स फोटोग्राफी अशा वेगवेगळ्या स्पर्धा घेण्यात आल्या तसेच त्या स्पर्धांसाठी वेगवेगळे विषय विद्यार्थ्यांना देण्यात आले होते. त्यामध्ये प्रामुख्याने एमर्जिंग ट्रेंड्स इन कॉमर्स, रोल ऑफ टेक्नॉलॉजी इन मॉडर्न अकाउंटिंग, इम्पॉर्टन्स ऑफ रिनिएबल एनर्जी रिसोर्सेस, रोल ऑफ आर्टिफिशियल इंटेलिजन्स इन शिपिंग द फ्युचर ऑफ एज्युकेशन, कॉस्मेटिक्स इलेक्ट्रॉनिक गॅजेट्स, इन्शुरन्स म्युच्युअल फंड्स, इक्विटी ऑरगॅनिक फूड, सेव वॉटर, सेव इलेक्ट्रिसिटी, सेव ट्रीज, जेंडर इक्वलिटी व झिरो हंगर या विषयांचा समावेश होता. त्या सर्व स्पर्धांचा निकाल जाहीर करण्यात आला. त्या सर्व स्पर्धेमधील विजेत्यांना पारितोषिके देण्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. प्रतिभा जाधव (चांगू काना ठाकूर महाविद्यालय) यांनी उपस्थित राहून त्यांच्या हस्ते सर्व विजेतांना प्रमाणपत्र व रोख रकमेची बक्षीसे दिली.

या वेळी रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका निशा नायर व रामशेठ ठाकूर महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे, सर्व विभाग प्रमुख यांच्या हस्ते ही पारितोषिके देण्यात आली. या सर्व स्पर्धा यशस्वी घेण्यासाठी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मेहनत घेतली. सूत्रसंचालन अंजलीजा शुक्ला व प्रा. शगुप्ता शान तसेच कार्यक्रमाच्या शेवटी प्रा. महेश धायगुडे यांनी आभार मानले.

दरम्यान, नवी मुंबईतील विविध उच्च माध्यमिक विद्यालयातील अकरावी व बारावीच्या सुमारे २०० विद्यार्थ्यांनी या स्पर्धांमध्ये सहभाग घेतला.

## चिरनेरच्या महागणपतीच्या दर्शनासाठी गर्दी

**चिरनेर : रामप्रहर वृत्त**

पेशव्यांच्या काळात महाराष्ट्रात अनेक ठिकाणी गणेशाची मंदिरे उभारण्यात आली. चिरनेर येथील गणपतीच्या मंदिराची निर्मिती पेशवे बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब पेशवे यांच्या कारकिर्दीत झाली. याच श्री महागणपती तीर्थक्षेत्रात बुधवारी (दि.१८) गणेश भक्तांनी प्राचीन श्री महागणपतीच्या दर्शनाचा लाभ घेतला.

पहाटेपासूनच श्रींच्या दर्शनाला सुरुवात झाली होती. या वेळी श्री महागणपतीच्या दर्शनासाठी नवविवाहित जोडप्यांसह अनेक गणेश



भक्तांनी आवर्जून हजेरी लावून, मनोभावे दर्शन घेतले. दरम्यान १७५८ ते फेब्रुवारी १७५९ मध्ये नानासाहेब पेशवे स्वतः कोकणात फिरलेले दिसून येतात. वसईच्या विजयानंतर कोकणातील उरण व कर्नाळा प्रांताचा कारभार नानासाहेबांचे सुभेदार रामजीपंत फडके यांनी चालविला.

हा कारभार करताना त्यांनी अनेक ठिकाणी देवळे बांधली. तसेच देवळांचा जीर्णोद्धार केला. चिरनेर येथील गणपती मंदिर हे हेमाडपंथीय धाटणीचे दिसून येते. हे गणपती देवस्थान अत्यंत जागृत असून, या ठिकाणी आलेल्या भक्तांची दुःखे निश्चित दूर होतात, अशी गणेश भक्तांची श्रद्धा आहे.

## कळंबोली आणि खांदेश्वरमध्ये १७ लाख रुपयांची विजचोरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खांदेश्वर वसाहतीमध्ये आणि कळंबोली गावामध्ये दोन वेगवेगळ्या ठिकाणी विजचोरी केल्यामुळे वीज महावितरण कंपनीने दोन वेगवेगळ्या पोलीस ठाण्यांमध्ये विज चोरी केलेल्या व्यक्तींविरोधात गुन्हे नोंदविले आहेत.

खांदेश्वर वसाहतीमधील सेक्टर ११ येथील मंगलमूर्ती टॉवरमधील एका वीज ग्राहकाने ७१,६९९ युनिट वीजेची चोरी केल्याचे वीज महावितरण कंपनीचे अभियंत्यांच्या तपासणीमध्ये आढळल्याने तब्बल १५ लाख २३ हजार ५१० रुपयांचे विजेचे देयक न भरल्याने खांदेश्वर पोलीस ठाण्यात वीज ग्राहकाविरोधात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

कळंबोली गावातील एका वीज ग्राहकाने मागील वर्षी नोव्हेंबर महिन्यापासून ते या वर्षी सप्टेंबर महिन्यापर्यंत ७,४२८ वीज युनीटची चोरी केल्याने वीज महावितरण कंपनीने या विज ग्राहकाविरोधात दोन लाख ५५ हजार ३७० रुपयांची विज चोरी केल्यामुळे कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविला आहे.

## घारापुरी लेण्यांना धक्का लागता कामा नये; अधिकाऱ्यांनी दक्षता घ्यावी

### मोरा वपोनि बडगुजर यांचे बैठकीत आवाहन

**उरण : प्रतिनिधी**

जागतिक वारसा लाभलेल्या घारापुरी लेण्यांची युनोस्कोत नोंद झाली आहे. त्यामुळे त्यास कोणत्याही प्रकारचा धक्का लागता कामा नये यासाठी येथे काम करीत असलेल्या सर्व विभागांच्या अधिकाऱ्यांनी दक्षता घ्यावी असे आवाहन मोरा सागरी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन बडगुजर यांनी काल १७ डिसेंबर रोजी बेटावर आयोजित बैठकीतुन केले.



येऊ घातलेल्या नाताळ व नवीन वर्षाचे स्वागताच्या निमित्ताने घारापुरी बेटावर मोठ्या संख्येने पर्यटक येतात. बेटावर येणाऱ्या देशी विदेशी पर्यटकांना कोणत्याही प्रकारची असुविधा होणार नाही. याची दक्षता घेण्यासाठी मोरा सागरी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन बडगुजर यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक बोलावण्यात आली होती.

या बैठकीत मेरी टाईम बोर्डचे सहा.बंदर निरीक्षक विनायक करंजे, गेट वे ऑफ इंडिया मुंबई जलवाहतूक संघटनेचे सुहान ईस्माईल मुल्ला, भारतीय पुरातत्व विभागाचे प्रविण कोळी, घारापुरी ग्रामपंचायतीच्या सरपंच मीना भोईर, उपसरपंच बळीराम ठाकूर, सदस्य सचिन लाड, घारापुरी लघुउद्योजक प्रतिनिधी सचिन म्हात्रे, शांताराम म्हात्रे, हॉटेल व्यवसायिक प्रतिनिधी शेखर पडते, संतोष कोळी, लोकल गाईडचे प्रतिनिधी प्रेमानंद शेवेकर, भारतीय पुरातत्व विभाग सिक्युरिटीचे अजय झा,आदी प्रमुख उपस्थित होते.विविध शासकीय विभागाचे १८ प्रतिनिधी तसेच ग्रामस्थ सहभागी झाले होते.

या बैठकीत मार्गदर्शन करताना वपोनि बडगुजर यांनी पर्यटकांच्या सुरक्षेबाबत प्रत्येक संबंधित विभागाने आपापली जबाबदारी व्यवस्थितरित्या पार पाडावी. प्रामुख्याने पर्यटक ज्या प्रमाणे सुखरूपपणे आणले त्याच पध्दतीने त्यांना सुखरूपपणे पोहोचविण्यासाठी आपण सर्वच शासकीय विभागांच्या अधिकाऱ्यांनी आपली नैतिक जबाबदारी स्वीकारून काम करण्याचे आवाहन केले. कुठलेही अनुचित प्रकार घडणार नाही. याचीही प्रत्येकाने दक्षता घेण्याची जाणीवही त्यांनी करून दिली.

## सोन्याच्या दागिन्यांची हरवलेली पिशवी पोलिसांमुळे सापडली

**पनवेल : वार्ताहर**

रिक्षा प्रवासादरम्यान रिक्षात विसरलेली सोन्याच्या दागिन्यांची पिशवी महिलेला पनवेल शहर पोलिसांनी परत मिळवून दिली आहे.

वत्सला राम पकडे (रा. घोट गाव) या खरेदी करता घोट गाव ते पनवेल भाजी मार्केट असा रिक्षाने प्रवास करताना त्यांच्यासोबत त्यांच्या घरातील अन्य चार महिला असे रिक्षामध्ये बसून महाराष्ट्र बँक, ओल्ड पनवेलसमोर उतरल्या होत्या. या वेळी त्यांच्याकडे असलेली बाजारा करता आणलेली ही पिशवी रिक्षामध्ये त्या विसरून खरेदी करता पनवेल बाजारपेठ येथे आले असता त्यांच्या असे लक्षात आले की त्यांच्या बरोबर असलेली पिशवी ही रिक्षामध्ये विसरून राहिली होती.

पिशवीमध्ये त्यांचे कानातील पाच ग्रॅम वजनाच्या सोन्याची साखळ्या होत्या. महिला पनवेल शहर पोलीस ठाणे येथे त्यांची पिशवी रिक्षात विसरल्याची तक्रार दिली. त्यानुसार पोलिसांनी माहिती देऊन महाराष्ट्र बँक ओल्ड पनवेल येथील सीसीटीव्ही तपासण्याकरता सांगितले. त्यांनी सीसीटीव्ही तपासून त्या आधारे रिक्षा ट्रेस करून चालक अनिकेत दुबे यांचा संपर्क क्रमांक मिळवला व झालेल्या प्रकाराबाबत माहिती दिली. त्यांनी रिक्षा तपासून वत्सला पगडे यांची पिशवी शहर पोलीस ठाणे येथे आणून दिली. ही पिशवी वत्सला पगडे यांना पोलिसांच्या उपस्थितीत देण्यात आलेले आहेत. पगडे यांनी पोलिसांचे आभार मानले आहेत.



## संपादकीय

# विधानाचा विपर्यास

संसदेत संविधानावर सुरू असलेल्या चर्चेदरम्यान डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयी केलेल्या एका वक्तव्यावरून केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना वादाच्या भोवऱ्यात अडकवण्याचा प्रयत्न काँग्रेस पक्षाकडून बुधवारी करण्यात आला, परंतु पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि स्वत: अमित शहा यांनीदेखील काँग्रेस पक्षच किती आणि कसा आंबेडकरविरोधी राहिला आहे हे तपशीलांनिशी सांगत, यासंदर्भात संभ्रम पसरवण्याचा काँग्रेसचा डाव उलटवून लावला.

**देशाच्या संविधानाचा स्वीकार केल्याला ७५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने संविधानाचे योगदान आणि महत्त्व आदी विषयांवर लोकसभा आणि राज्यसभा या दोन्ही सभागृहांत चर्चेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी संविधानाच्या ७५ वर्षांच्या गौरवयात्रेची चर्चा झाली. भारतीय जनता पक्षाच्या वक्त्यांनी या वेळी संविधानाच्या मूल्यांवर भाष्य केले. यात गृहमंत्री अमित शाह यांचेही भाषण झाले. या वेळी देशाचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या पहिल्या मंत्रिमंडळातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या राजीनाम्याचा उल्लेख शाह यांनी केला. या भाषणादरम्यान, हल्ली आंबेडकरांचे नाव घेण्याची फॅशन झाली आहे एवढे जर देवाचे नाव घेतले असते तर तुम्हाला सात जन्मांसाठी स्वर्ग प्राप्त झाला असता, असे वक्तव्य अमित शाह यांनी केले. शाह यांच्या या वक्तव्यावर विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी तीव्र आक्षेप घेतला व नंतर काँग्रेस पक्षाकडून संसदेबाहेर निदर्शनेही करण्यात आली, परंतु अमित शाह यांनी डॉ. बाबासाहेबांचा अपमान करणाऱ्यांचा काळा इतिहास उघड केला आहे असे 'एक्स' या समाजमाध्यमावर ट्वीट करत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शाह यांचे समर्थन केले. स्वत: अमित शाह यांनीदेखील संध्याकाळी पत्रकार परिषद घेऊन काँग्रेस पक्षच कसा आंबेडकरविरोधी आहे हे अनेक तपशीलांसह समोर ठेवले. माध्यमांनी संसदेतील आपले संपूर्ण विधान लोकांपर्यंत पोहचवावे व त्याविषयी संभ्रम निर्माण करण्याचे काँग्रेसचे प्रयत्न हाणून पाडावेत, असे आवाहनही शाह यांनी या वेळी केले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या कालखंडापासून काँग्रेस पक्षाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा कशारीतीने अवमान केला याची उजळणीच त्यांनी या वेळी केली. कलम ३७० विषयीचे आंबेडकरांचे विचार काँग्रेसने मानले नाहीत हे नमूद करत, बाबासाहेबांनी देशाच्या पहिल्या मंत्रिमंडळाचा राजीनामा का दिला होता, असा सवाल त्यांनी केला. अनुसूचित जाती-जमातींना मिळणाऱ्या वागुणकीबाबत आपण असमाधानी असल्याचे बाबासाहेबांनी त्यावेळी अनेकदा सांगितले होते. सरकारच्या परराष्ट्र धोरणाशीही ते असहमत होते. काँग्रेस पक्षाने त्यावेळी ज्यांचा विरोध केला, त्यांचेच नाव ते आता केवळ मतांसाठी घेत आहेत, हे कितपत योग्य आहे, असा प्रश्न शाह यांनी काँग्रेस पक्षाला केला. काँग्रेस पक्ष हा आंबेडकरविरोधी, आरक्षणविरोधी तसेच संविधानविरोधी पक्ष आहे. त्यांनी सावरकरांसारख्या थोर व्यक्तीचादेखील अपमान केला. देशावर आणीबाणी लादून काँग्रेस पक्षाने संविधानातील सर्व मूल्यांच्या ठिकऱ्या उडवल्या, याचीही आठवण शहा यांनी या वेळी करून दिली, हे बरेच झाले. बाबासाहेबांच्या पदस्पर्शाने पावन झालेली पंचतीर्थे आम्ही विकसित केली असून बाबासाहेबांची स्वप्ने पूर्ण करण्यासाठीच आम्ही अविरत झटतो आहोत, असे शाह म्हणाले. राज्यसभेतील अमित शहा यांच्या वक्तव्याची मोडतोड करून संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न काँग्रेस पक्षाने केला खरा, पण तपशीलांनिशी प्रतिहल्ला चढवत शाह यांनी तो हाणून पाडला आहे.**

# 'वीआरमोर'द्वारे महिलांसाठी आरोग्यवर्धक संधी




पोलादपूर तालुक्यातील पळचिल गावातील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये १०वी पर्यंत शिक्षण घेतल्यानंतर सीबीएससीची १२वीची परिक्षा दिल्यानंतर पुन्हा पोलादपूरच्या सुंदरराव मोरे महाविद्यालयामध्ये पदवीचे शिक्षण घेतलेला आकाश धनराज गोपाळ या विद्यार्थ्याची आकाशझेप गेल्या काही वर्षांमध्ये अखंड पोलादपूरवासियांना अभिमानास्पद वाटू लागली आहे. २०१९ मध्ये 'वीआरमोर' या महिलांसाठी सॅनिटरी पॅडस् च्या उत्पादनासाठी महिलांना एकत्र करून आकाशने सुरू केलेल्या व्यवसायाला अल्पावधीतच कोरोना लॉकडाऊनचा फटका बसण्याची चिन्हे दिसून आली. मात्र, या लॉकडाऊनच्या काळात महिलांना सॅनिटरी पॅड उपलब्ध होत नसल्याने आकाशने समाजसेवा म्हणून महिलांना पॅड उपलब्ध करून दिले. आता सुमारे पाच वर्षांच्या कालावधीमध्ये आकाशच्या कल्पकतेमुळे महाराष्ट्रातील सर्वच प्रमुख शहरामध्ये 'वीआरमोर' या सॅनिटरी पॅडस्च्या उत्पादनाची डिस्ट्रीब्युटरशिप सुरू करून महिलांना निर्मितीपासून विक्रीपर्यंत सहभागी करण्यात आले आहे.

सध्याच्या धावपळीच्या युगात महिलांना अनेक प्रश्नांना सामोरे जावे लागते. त्यातील दोन महत्त्वाचे प्रश्न म्हणजे महिलांचे आरोग्य आणि महिलांचा बेरोजगारीचा प्रश्न. पण या विषयात प्रत्येकाला वेळेवर पुरेसे मार्गदर्शन मिळत नसल्याने अनेक महिलांमध्ये कुवत आणि क्षमता असूनही त्या आपले कर्तृत्व सिध्द करण्यास कमी पडतात आणि हीच गोष्ट लक्षात घेऊन महिलांच्या या दोन्ही समस्या दूर करण्यासाठी वीआरमोर सोल्युशन कंपनीचे सी.एम.डी. विकास गोपाळ आणि एम.डी. प्रिया कड यांनी वीआरमोर नावाची संस्था स्थापन करून महिलांना संघटित केले.

खऱ्या अर्थाने विश्ववंदनीय भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त आदरांजली वाहिली. स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांनी माता भगिनीचा जसा आदर केला. महिलेला सन्मान दिला. महात्मा फुले आणि सावित्रीबाईनी स्त्री शिक्षणासाठी जीवाचे रान केले तसेच कार्य खऱ्या अर्थाने या व्यवसायातून गोपाळ करीत आहेत.

**खबरबात**
**शैलेश पालकर**

शहरापासून खेडेगावातील वाडी, वस्तीपर्यंतच्या शेवटच्या महिलेला निरोगी व सुदृढआरोग्य मिळण्यासाठी आरोग्य विषयक समस्यांचा निपटारा करण्याकरता संपूर्ण देशभरात महिलांमध्ये जनजागृतीचे काम करीत असून एक लाख प्लस महिलांना स्वत:च्या रोजगारातून आर्थिक उत्पन्नाची हमी मिळवून दिला तर निरोगी आरोग्यासाठी वीस लाखाच्या वरती दरमहा वापरकर्ते आहेत. गर्भाशयाचे आजार, कर्करोगाविषयी उत्तम गुणवत्तेचे फूड सप्लीमेंट आणून भविष्यात कर्करोगाचे समुळ उच्चाटन व मधुमेहाचे समुळ उच्चाटनासाठी काम करणार असल्याचे महाराष्ट्राचे पॅडमन विकास गोपाळ यांनी सांगितले.

नाशिक मधील जवळपास ३०हजार महिला वापरकर्ता असल्याने त्यांची गैरसोय होऊ नये, त्यामुळे पाथर्डी फाटा येथे सुरू असलेले कार्यालय नासिकमधील मध्यवर्ती ठिकाण असलेले द्वारका सर्कलजवळ पखाल रोडवर एनडीसीसी बँकेच्या मध्यवर्ती कार्यालयाशेजारी प्रशस्त अशा सर्व सोयीसुविधांनी युक्त कार्यालयाचा शुभारंभ प्रख्यात शास्त्रज्ञ धनंजय पाटील यांच्या हस्ते करण्यात आले तर उद्घाटन सी.एम.डी. विकास गोपाळ, प्रिया कड तसेच संदीप भालेकर, दिनेश शिंदे यांच्या शुभहस्ते मार्गशीर्ष महिन्याच्या पहिल्या गुरूवारी ढोल ताशांच्या गजरात फटाक्यांच्या आतिषबाजीत दिमाखदार सोहळ्यात झाले.

या वेळी महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यातून मान्यवर महिला माता-भगिनी शेकडो च्या संख्येने उपस्थित होत्या. प्रत्येकाचे स्वप्न आरोग्य आर्थिक स्वायत्तता व इच्छा यांची पूर्तता व मार्गदर्शन करण्यासाठी नासिक येथील मध्यवर्ती कार्यालय कटिबध्द असल्याचे प्रतिपादन या वेळी दिनेश शिंदे यांनी केले आहे.

विकास गोपाळ यांना पोलादपूर तालुक्यातून राज्यातील शहरी भागामध्ये गेल्यानंतर यशस्वी उद्योजक पुरस्कार सिनेअभिनेत्री मानसी नाईक यांच्याहस्ते मिळाला. राजभवनामध्ये भगतसिंह कोश्यारी यांच्याहस्ते अभिनेत्री दिपाली सय्यद यांच्या प्रमुख उपस्थितीत महाराष्ट्राचा कोविड योध्दा पुरस्कार प्रदान करण्यात आला. अहमदनगर येथे माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांच्याहस्ते शिवछत्रपती आदर्श पॅडमॅन पुरस्कार प्रदान करण्यात आला. रायगड जिल्हा संघर्ष पत्रकार असोसिएशनतर्फे महाराष्ट्रभूषण पुरस्कार देण्यात आला. दैनिक पुढारीतर्फे आयोजित कार्यक्रमामध्ये माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याहस्ते यूथ आयकॉन पुरस्कार प्रदान करण्यात आला. अमृता फडणवीस यांच्याहस्ते आदर्श युवा उद्योजक पुरस्कार प्रदान करण्यात आला. आता विकास गोपाळ याच्याकडे राज्यातील महिलाभगिनींच्या सेवेतील आदर्श तरूण म्हणून पाहिले जात असून 'वीआरमोर' या सॅनिटरी पॅडस् च्या उत्पादनाद्वारे ते घराघरात आणि प्रत्येक कार्यालयात वकाअग वूमन आणि स्कूल कॉलेज गर्लसपर्यंत पोहचले आहेत.

# आज गोवा मुक्ती दिन

पोर्तुगीजांच्या ताब्यात असलेला गोवा १९ डिसेंबर १९६१ रोजी पारतंत्र्यातून मुक्त झाला आणि भारतात त्याचा समावेश झाला. अनेकांनी प्राणांचे मोल देऊन गोव्याला स्वातंत्र्य मिळवून दिले...

१५१०मध्ये पोर्तुगीजांनी गोव्याच्या भूमीवर पाय ठेवला तेव्हापासून गोमंतकीय जनतेचे जे नष्टचर्य सुरू झाले ते तब्बल साडेचारशे वर्षांनंतर १९ डिसेंबर १९६१ रोजी संपले. १९६१च्या युद्धानंतर भारतभूमीवरील उरलेसुरले पोर्तुगीज अधिपत्य समाप्त झाले, तसेच गोवा, दमण व दीव हा प्रदेश संपूर्णपणे मुक्त झाला. या अर्थाने, १९६१चे युद्ध हा गोवा मुक्ती प्रक्रियेचा शेवटचा व अत्यंत महत्त्वपूर्ण टप्पा होता.

हे मुक्तियुद्ध म्हणजे गोवा मुक्ती आंदोलनाचा निर्णायक भाग होता. या युद्धाव्यतिरिक्त गोवा मुक्ती आंदोलनाचा खूप मोठा इतिहास आहे, ज्यामध्ये स्थानिक गोवेकर स्वातंत्र्यसैनिकांचा खूप मोठा वाटा आहे. भारतातील घडामोडी शांत झाल्यावर पंतप्रधान पंडित नेहरु यांनी गोव्याच्या स्वातंत्र्यावर भर दिला, पण गोव्याचे भारतात विलिनीकरण करण्याच्या बाजूने पोर्तुगीज नव्हते. नेहरु यांनी भारत आणि पोर्तुगीज कॉलनीत चांगले संबंध राहण्याच्या दिशेने पाऊले उचलली; पण या कॉलन्यांमधील प्रशासक भारताला सहकार्य करीत नव्हते. अखेर नेहरु यांनी संयुक्त राष्ट्रसंघाच्या माध्यमातून पोर्तुगीजांवर दबाव आणला. शांततेच्या मार्गाने भारत सोडून जाण्याचा संदेश दिला. वाटाघाटी यशस्वी होत नसल्याने, जवाहरलाल नेहरु यांनी १७ डिसेंबर १९६१ रोजी आंतरराष्ट्रीय दबावाला न जुमानता भारतीय सैन्य गोव्यात घुसवण्याचा निर्णय घेतला. गोव्यातील जनतेने सैन्याचे स्वागत आणि सहकार्य केले. अखेर १९ डिसेंबर १९६१ रोजी गोव्यात तिरंगा फडकला आणि गोवा मुक्त झाला. दीव आणि दमण आधीच मुक्त झाले होते.

या तिघांना मिळून केंद्रशासित प्रदेशाचा दर्जा मिळाला. नंतर १९६७मध्ये सार्वमताने गोवा घटक राज्य म्हणून घोषित झाले. पणजी हे शहर गोव्याची राजधानी असून वास्को हे राज्यातील सर्वांत मोठे, तर पोर्तुगीजांचा प्रभाव असलेले ऐतिहासिक मडगाव हे राज्यातील महत्त्वाचे शहर आहे.

**-संजीव वेलणकर**



## बदलते तंत्रज्ञान

# 'जिओ'च्या न्यू इयर प्लॅनबद्दल जाणून घ्या...

नवीन वर्ष सुरू होण्यास अवघे काही दिवस शिल्लक राहिले आहेत. अशातच रिलायन्स जिओने नवीन वर्षाचे स्वागत करीत ग्राहकांसाठी नवीन ऑफरसुद्धा लाँच केली आहे. जिओने २०25 रुपयांच्या अगदी नवीन प्रीपेड प्लॅनसह नवीन वर्ष साजरे करण्यासाठी सज्ञ झाली आहे या मर्यादित कालावधीच्या ऑफरमध्ये अमर्यादित व्हॉइस व ५जी डेटा आणि २,१५० रुपये किमतीचे अतिरिक्त फायदेसुद्धा देणार आहे. तर नक्की हा प्लॅन किती दिवसांसाठी वैध असेल हे आपण जाणून घेऊ




२०25 रुपयांचा हा नवीन प्लॅन दैनंदिन २.५ जीबी डेटाची ऑफर देतो, ज्यामुळे तुम्ही दिवसभर नेट वापरू शकता. तुम्हाला हा प्लॅन २०० दिवसांच्या वैधतेसह अमर्यादित व्हॉइस कॉल आणि १०० एसएमएस देईल. त्याचा अर्थ तुम्ही जवळपास सात महिने रिचार्जिंगची चिंता न करता इंटरनेटचा आनंद घेऊ शकता. तुम्ही तुमच्या एरियात जिओ वेलकम ऑफरसाठी पात्र असाल, तर तुम्हाला अमर्यादित ५जीदेखील मिळेल.

तसेच जिओ या प्लॅनसह २,१५० रुपयांची व्हॅल्यू बॅक कूपन ऑफर करीत आहे. त्यामध्ये पुढील गोष्टींचा समावेश असेल.

१. जिओवर जर २,९९९ रुपयांच्या ऑर्डरवर तुम्हाला ५०० रुपयांची सूट दिली जाईल.


२. EaseMyTrip.comवर फ्लाइट बुकिंगवर केल्यास १,५०० रुपयांपर्यंत तुम्हाला सूट दिली जाईल.

३. 'स्विगी'वर ४९९ रुपयांपेक्षा जास्तची तुम्ही ऑर्डरसाठी दिलीत, तर तुम्हाला १५० रुपयांची सूट दिली जाईल.

जर तुम्हाला ऑनलाइन शॉपिंग किंवा सतत पदार्थ ऑर्डर आणि प्रवास करण्याची सवय असेल आणि तुम्हाला सतत रिचार्ज करण्याचा कंटाळा येत असेल तरीसुद्धा या प्लॅनचा आनंद घेऊ शकता. तर ही लिमिटेड टाईम ऑफर माय जिओ ॲप आणि जिओच्या अधिकृत वेबसाईटवर उपलब्ध आहे.

जिओ २.५ जीबी दैनिक डेटासह आणखी तीन प्रीपेड प्लॅन ऑफर करते. त्यामध्ये ३९९, ३,५९९, ३,९९९ रुपयांच्या प्लॅनचा समावेश आहे. ३९९ रुपयांच्या प्लॅनमध्ये तुम्हाला अमर्यादित ५जी डेटासह २८ दिवस (एकूण ७० जीबी) मिळतात, तर ३,५९९ आणि ३,९९९च्या प्लॅनमध्ये ३६५ दिवसांची वैधता मिळते. जवळपास १ टीबी वार्षिक डेटा मिळतो आणि स्पोर्ट्सप्रेमींसाठी फॅनकोड सबस्क्रिप्शनदेखील उपलब्ध आहे.

# हरहुन्नरी कलावंत ओमप्रकाश बक्षी



**निमित्त**

चरित्र अभिनेते ओमप्रकाश बक्षी यांचा जन्म १९ डिसेंबर १९१९ रोजी झाला २१ फेब्रुवारी १९९८ रोजी त्यांचे निधन झाले. या हरहुन्नरी कलावंताबद्दल जाणून घेऊया.

ओमप्रकाश यांना चरित्र अभिनेता म्हटले म्हणजे झाले, अशी वस्तुस्थिती नाही. हा कलावंत नायक, खलनायक, चरित्र अभिनेता, चित्रपट निर्माता, दिग्दर्शक आणि विनोदी अभिनेताही होता. त्यांच्या विनोदी भूमिकांचे प्रमाण थोडे जास्त असल्यामुळे पटकन ओमप्रकाश कोण, तर 'विनोदी अभिनेता ना!' असेच म्हटले जाते, पण विविध प्रकारच्या भूमिकांतून अभिनयाचे विविध पैलू दाखवणारे हे व्यक्तिमत्त्व तसे फार वेगळे होते.

लाहोर येथे सधन कुटुंबात जन्मलेल्या ओमप्रकाश बक्षी यांना लहानपणापासून चित्रपटांचेच आकर्षण होते. आपण सिनेमात जाऊन अभिनेता व्हावे, असे त्यांना वाटत होते, पण मार्ग सापडत नव्हता. वयाच्या सतराव्या वर्षी त्यांनी लाँड्री व्यवसाय सुरू केला, पण दोन वर्षांतच तो बंद करून ते लाहोरच्या रेडिओ स्टेशनवर नोकरीस गेले. तेथे होणाऱ्या नाटकांमध्ये एक कलाकार म्हणून ते बऱ्यापैकी रमले, पण काही काळातच तेही त्यांनी बंद केले, पण बहुधा त्यामधील त्यांचे काम पाहून प्रसिद्ध चित्रपट निर्माते दलसुखलाल पंचोली यांनी त्यांना बोलावून घेतले आणि आपल्या 'दासी' चित्रपटातील एक भूमिका त्यांना देऊ केली. १९४४मध्ये 'दासी' प्रदर्शित झाला आणि चांगला चाललाही! नंतर धमकी, शहर से दूर, पगडंडी, आयी बहार, असे काही चित्रपट त्यांना मिळत गेले. १९४७च्या फाळणीवेळी ते लाहोर सोडून मुंबईला आले; पण एक-दोन वर्षे मुंबईतील चित्रपट जगतात त्यांना काम मिळाले नाही.

१९४८मध्ये निर्माते जयंत देसाई यांनी त्यांना 'लखपती' या चित्रपटात खलनायकाचे काम दिले. ओमप्रकाश यांचे त्यापूर्वीचे एक-दोन चित्रपट देसाई यांनी पाहिले होते. त्यामुळेच हा कलावंत व त्याचे गुण त्यांनी जाणले होते. आणि जयंत देसाईंचा तो अंदाज खरा ठरला व 'लखपती'मधून ओमप्रकाश यांना प्रसिद्धी मिळून त्यांची वाटचाल सुरू झाली. ती अखंड सुरूच राहिली.

ओमप्रकाश यांची बोलण्याची विशिष्ट ढब, आवाजातील चढ-उतार, त्यात मधूनच आणलेला हेतुपुरस्सर चिरकेपणा आणि जबरदस्त टायमिंग या उपजत वैशिष्ट्यांमुळे हा कलावंत समोर कोणताही अभिनेता असला तरी आपला प्रभाव पाडून जात असे! ओमप्रकाश नायक म्हणून शोभणारा चेहरा घेऊन आले नव्हते; पण तरीही 'घंघरू' या १९५२च्या चित्रपटात त्यांनी प्रौढ नायकाची भूमिका केली होती.

अभिनयाव्यतिरिक्त ओमप्रकाश यांनी 'लाइट ॲण्ड शेड' ही स्वतःची निर्मितीसंस्था काढून, दुनिया गोल है, चाचा झिंदाबाद, संजोग, जहाँ आरा, गेट वे ऑफ इंडिया, कन्हैया अशा काही चित्रपटांची निर्मितीही केली होती. त्यातील काही चित्रपट त्यांनी स्वतः दिग्दर्शितही केले होते. परंतु उत्कृष्ट गीते आणि वेगळी कथानके असलेले हे चित्रपट प्रचंड लोकप्रियता मिळवू शकले नव्हते, एवढेच ओमप्रकाश यांचे दुर्दैव होते. परंतु त्यांची चित्रपटसृष्टीतील एकूण कारकीर्द यशस्वी आणि देदीप्यमान ठरली. जातिवंत, उत्कृष्ट अभिनेता म्हणूनच त्यांचे नाव आदराने घेतले जाते! अशा या कलावंताला अभिवादन करून त्यानेच निर्मिती केलेल्या चित्रपटातील एक सुनहरे गीत अनुभवू या!

ओमप्रकाश यांनी निर्मिती केलेला 'संजोग' हा चित्रपट १९६१मध्ये प्रदर्शित झाला होता. प्रदीपकुमार आणि अनिता गुहा हे त्याचे नायक-नायिका होते. प्रमोद चक्रवर्ती यांनी तो चित्रपट दिग्दर्शित केला होता. राजेंद्रकृष्ण यांनी लिहिलेली आठ गीते या चित्रपटासाठी मदनमोहन यांनी संगीतबद्ध केली होती.

**-पद्माकर पाठक**

**क्लिक...क्लिक...!**



**मुरुड : येथील निसर्गरम्य परिसराचे डोंगरी टेकडीवरून छायाचित्रकार सुधीर नाझरे यांनी टिपलेले सुंदर छायाचित्र.**

## आरोग्य प्रहर

# हिवाळ्यात 'अशा' पद्धतीने घ्या आरोग्याची काळजी



राज्यभरात काही प्रमाणात थंडीचा कडाका जाणवू लागला आहे. उकाडा कमी झाल्याने ही थंडी काहीशी आल्हाददायक वाटत असली तरी त्याचा त्रास होऊ नये म्हणून काळजी घेणे महत्त्वाचे आहे. त्यामध्ये शरीराचे तापमान योग्य राहावे यासाठी आहारात कोणत्या पदार्थांचा समावेश करावा. काय काळजी घ्यावी? यांसारखे प्रश्न आपल्याला नेहमीच पडतात. तेव्हा काय काळजी घ्यावी याच संदर्भात पुण्याच्या मदरहूड हॉस्पिटल आहारतज्ज्ञ सल्लागार, डीटी इंशारा महेदवी यांनी सविस्तर माहिती दिली आहे.

या ऋतूमध्ये आर्द्रता आणि तापमानातील चढ-उतारांमुळे विषाणू आणि आजार नेहमीपेक्षा वेगाने पसरणे सोपे होते. या काळात लहान मुले आणि प्रौढांना अनेकदा खोकला, ताप, फ्लू आणि संसर्ग यांसारख्या हंगामी आजारांचा सामना करावा लागतो. त्यामुळे अस्वस्थता निर्माण होऊ शकते, असे आहारतज्ज्ञ इंशारा महेदवी यांनी सांगितले.

दिल्लीच्या सी. के. बिर्ला हॉस्पिटलचे संचालक पल्मोनोलॉजिस्ट डॉ. विकास मित्तल म्हणाले, फ्लू हा इन्फ्लूएंझा विषाणूमुळे होतो, जो लहान मुले, प्रौढ आणि वृद्धांसह सर्व वयोगटांतील लोकांना प्रभावित करतो. फ्लूची लक्षणे सहसा सामान्य सर्दीसारखी दिसतात; परंतु रोगप्रतिकार शक्ती कमी असलेल्या व्यक्तींमध्ये हा आजार गंभीर रूप धारण करू शकतो. पाच वर्षांखालील मुले आणि ६० वर्षांवरील प्रौढांना फ्लूमुळे न्यूमोनियासारखी गुंतागुंत होऊ शकते, जी जीवघेणी ठरू शकते.

### फ्लूपासून असे रहा सुरक्षित

* शारीरिक अंतर राखणे : गर्दीच्या ठिकाणी इतरांपासून किमान सहा फूट अंतर ठेवा.
* हाताच्या स्वच्छतेचा चांगला सराव करा : आपले हात नियमितपणे धुवा; विशेषत: चेहरा, नाक किंवा तोंडाला स्पर्श करण्यापूर्वी.
* तोंड आणि नाक झाकून घ्या : खोकताना किंवा शिंकताना टिश्यू किंवा रुमालाचा वापर करा.
* मास्क वापरा : एखाद्या व्यक्तीला सर्दी किंवा फ्लूची लक्षणे असल्यास, मास्क घातल्याने विषाणूचा प्रसार रोखता येतो.

याशिवाय प्रतिकारशक्ती मजबूत करणेही महत्त्वाचे आहे, असे डॉ. मित्तल यांनी सांगितले. दैनंदिन पौष्टिक आहार घेतल्यास रोगप्रतिकार शक्ती मजबूत होण्यास मदत होऊ शकते, जी या आरोग्यविषयक गुंतागुंतीविरुद्ध लढण्यासाठी एक ढाल म्हणून काम करू शकते. दैनंदिन आहारात विशेषतः रोगप्रतिकार शक्ती वाढवणारे पोषक पदार्थ समाविष्ट करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

# माथेरान परिसरात बिबट्याची दहशत

## म्हशीच्या पारडूवर जीवघेणा हल्ला; नागरिक भयभीत

**नेरळ : प्रतिनिधी**

माथेरान डोंगर जंगल परिसरात बिबट्याची दहशत पुन्हा एकदा मिळत आहे. बिबट्याने रानात चरण्यासाठी गेलेल्या म्हशीच्या पारडूचा फडशा पाडला आहे. त्यामुळे माथेरान डोंगर जंगल परिसरात राहणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

जागतिक दर्जाचे पर्यटनस्थळ असणाऱ्या कर्जत तालुक्यातील माथेरानच्या डोंगर कुशीत धनगर टप्पा म्हणून ओळखली जाणारी धसवाडी वसलेली आहे.नेरळ ग्रामपंचायत हद्दीत अतीदुर्गम भागात वसलेली ही नागरी वस्ती असून येथे मोठ्या प्रमाणत दुग्ध व्यवसाय करणारे शेतकरी राहतात.दरम्यान येथे राहणारे शेतकरी धोंडू धाऊ आखाडे यांच्या म्हशी या नेहमीप्रमाणे मंगळवार १७ डिसेंबर रोजी रानात चरण्यासाठी सोडण्यात आल्या होत्या.मात्र यातील एका म्हशीचे पारडू घरी परतले नसल्याने याचा



शोध घेण्यासाठी गेलेले शेतकरी आखाडे यांना म्हशीचे पारडू हे अर्धवट खालेल्ल्या अवस्थेत मृत भेटले.

जंगलातील हिंस्र प्राणी बिबट्याने यावर हल्ला केल्याचा संशय या वेळी शेतकऱ्याने व्यक्त केला. या घटनेची माहिती मिळताच माथेरान वनविभागाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले होते. बिबट्याच्या दहशतीमुळे येथील नागरिकांनी भीती व्यक्त केली असून वन विभागाने या बिबट्याच्या बंदोबस्त लवकरात लवकर करावा म्हणून मागणी लावून धरली.

या परिसरात काही महिन्यापूर्वी रेल्वे लाईन जवळ उभा असलेल्या बिबट्याचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले होते.त्यामुळे माथेरानच्या जंगल परिसरात खुलेआम बिबट्या फिरत असल्याने सुरुवातीला नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले होते तर यावर वनविभागाकडून अधिकृत अशी कुठलीही माहिती देण्यात आली नसल्याने ही माहिती फेक असल्याचे देखील चर्चा होती, मात्र आता शेतकऱ्याच्या या घटनेने पुन्हा एकदा बिबट्याची दहशत समोर आली असून माथेरानच्या जंगल परिसरात बिबट्यांचा वावर असल्याचे निश्चित मानले जात आहे.

माथेरान घाटात सकाळच्या पहारी मॉर्निंग वॉक साठी येणाऱ्या नागरिकांसाठी आता ही चिंतेची बाब बनली असून वनविभागाकडून काही जंगल परिसरात नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून बिबट्या बाबत माहितीचे बॅनर झळकावून सूचना देखील करण्यात आल्याची माहिती वनविभाकडून देण्यात आली आहे.

# मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजना

## तरुण-तरुणींना उद्योजक बनण्याची सुवर्णसंधी

**रायगड : रामप्रहर वृत्त**

राज्याच्या नवीन औद्योगिक धोरण-२०१९ अंतर्गत अनेक नाविन्यपूर्ण योजना व कार्यक्रम महाराष्ट्र शासनाने हाती घेतले आहेत. सूक्ष्म व लघु उपक्रमांना चालना देण्यासाठी तसेच राज्यात व्यापक प्रमाणात रोजगाराच्या संधी स्थानिक ठिकाणी उपलब्ध होण्यासाठी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजना जाहीर केली आहे.

योजनेचा उदेश-राज्यातील युवक/युवतींच्या सर्जनशिलतेला वाव मिळून राज्यात स्वयंरोजगारास पूरक वातावरण तयार करणे, त्याद्वारे राज्यात ग्रामीण तसेच शहरी क्षेत्रात सूक्ष्म, लघु उपक्रमांद्वारे व्यापक रोजगाराच्या संधी निर्माण होण्यासाठी शासनाच्या आर्थिक सहाय्यातून प्रकल्प उभारणीस हातभार लावणे.

पात्रता व अटी :- राज्यात स्थानिक अधिवास असलेल्या व किमान १८ से ४५ वयोगटातील स्वयंरोजगार करू इचिछणारे उमेदवार. विशेष प्रवर्गासाठी (अनुसूचित जाती, जमाती, महिला,अपंग,माजी सैनिक,इ.मा.व.,वि.जा.,अ.ज.,अल्पसंख्याक) ५ वर्षांची अट शिथिल, रु. १० लाखावरील प्रकल्पांसाठी किमान शैक्षणिक पात्रता ७ वी पास व रू. २५ लाखांवरील प्रकल्पांसाठी किमान १० वी पास, अर्जदाराने यापूर्वी अनुदान समाविष्ट असलेल्या राज्य तसेच केंद्र शासनाच्या/महामंडळाच्या योजनेतून लाभ घेतलेला नसावा.

प्रकल्प मर्यादा किंमत- प्रक्रिया व निर्मिती प्रकल्पांसाठी कमाल रु.५० लाख व सेवा,कृषी पूरक उद्योग प्रवर्गातील प्रकल्पांसाठी कमाल रु. २० लाख. योजना अंमलबजावणी यंत्रणा - शहरी भागासाठी जिल्हा उद्योग केंद्र, ग्रामीण भागांसाठी जिल्हा खादी व ग्रामोद्योग कार्यालय एकत्रित समन्वय व सनियंत्रण, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र.

योजनेअंतर्गत पात्र घटक- सेवा उद्योग, कृषी पूरक व्यवसाय, कृषीवर आधारीत उद्योग, ई. वाहतूक व्यवसाय,फिरते विक्री केंद्र इ., अर्जाच्या संपूर्ण प्रक्रियेसाठी https://maha-cmegp.gov.in, ऑनलाईन पध्दतीचा अवलंब करण्यात येईल. उत्पादन प्रवर्गातील उद्योगांसाठी २ आठवडे व सेवा, कृषीपुरक उद्योग व्यवसायासाठी १ आठवडा मुदतीचे प्रशिक्षण असेल.

या योजनकरिता सर्वसाधारण आवश्यक कागदपत्रे : जन्मदाखला/शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र/वयाचा पुरावा, शैक्षणिक पात्रते संबंधिचे कागदपत्रे प्रमाणपत्रे, आधारकार्ड, पॅनकार्ड, नियोजित उद्योग, व्यवसाय जागेबाबतचे दस्ताऐवज, भाडेकरार (सध्या कागदावरील प्राथमिक संमती), बँक मंजुरीनंतर नोंदणीकृत भाडेकरार बँकेस सादर करावा लागेल, जातीचे प्रमाणपत्र (एस.सी.एस.टी. प्रवर्गासाठी), विशेष प्रवर्गासाठीचे पूरक प्रमाणपत्र (अपंग, माजी सैनिक), वाहतुकीसाठी परवानगी व वाहन चालविण्याचा परवाना, स्वसाक्षांकित विहित नमुन्यातील वचनपत्र. अधिकमाहितीसाठी महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, रायगड बाजार समोर, रायगड-अलिबाग येथे संपर्क साधावा.

# खासदार सुनील तटकरे यांच्या प्रयत्नाना यश; रोहा रेल्वेस्थानकात जलद गाड्यांना थांबा

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा रेल्वे स्थानकात लांब पल्ल्याच्या गाडयांना थांबा मिळावा या प्रवासांच्या हिताच्या दृष्टिकोनातून खासदार सुनील तटकरे यांनी केलेले प्रयत्न यशस्वी झाले असून रोह्यात लांब पल्ल्याच्या जलद गाड्यांना थांबा देण्यात आला आहे. ही मागणी पूर्ण केल्याने खा सुनील तटकरे यांनी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांचे आभार मानले आहेत.

रोहा रेल्वे स्थानकात लांब पल्ल्याच्या गाडयांना थांबा मिळावा अशी मागणी प्रवासी वर्गाची होती.

**रोहा रेल्वे स्थानकात या गाड्यांना देण्यात आला थांबा**

*लोकमान्य टिळक (टी)-मडगाव एक्सप्रेस, कोचुवेली-चंदीगड केरळा संपर्क क्रांती एक्सप्रेस, कोचुवेली-इंदूर एक्सप्रेस, हिसार-कोयंबतूर एसी एक्सप्रेस आणि दादर-तिरुनेलवेली एक्सप्रेस*

प्रवासी संघटनांनी खा. सुनील तटकरे यांची भेट घेत रोहा रेल्वे स्थानकात लांब पल्ल्याच्या जलद गाड्यांना थांबा द्यावा, अशी मागणी केली होती. खासदार सुनील तटकरे यांनी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे रोह्यात जलद गाड्यांना थांबा मिळावा यासाठी पत्रव्यवहार केला व त्यांची भेट घेत रोहा रेल्वे स्थानकात जलदगाडयांना थांबा देण्याची मागणी केली.

या निर्णयाचा स्थानिक नागरिकांना मोठा फायदा होणार असून, प्रवासासाठी अधिक पर्याय उपलब्ध होतील. वेळेची बचत होऊन प्रवास अधिक सोयीस्कर आणि सुलभ होईल.

विशेषतः विद्यार्थी, कामगार, व्यापारी आणि प्रवास करणाऱ्या सर्वसामान्य जनतेसाठी ही सुविधा खूप महत्त्वाची ठरेल. यामुळे रोहा परिसरातील व्यापार-उदीमाला चालना मिळेल, शिक्षणासाठी ये-जा करणाऱ्या विद्यार्थ्यांना अधिक सोयीस्कर प्रवास साध्य होईल आणि सामाजिक व आर्थिक विकासाला नवी गती मिळेल. हा निर्णय केवळ प्रवासाची सोय पुरवणारा नसून, तो रोहा परिसराच्या एकूणच प्रगतीचा एक महत्त्वाचा टप्पा ठरेल.

**या सकारात्मक निर्णयासाठी आपल्या सर्वांच्या सहकार्यामुळे प्रयत्नांना यश मिळाले आहे. मतदारसंघातील प्रश्न सोडवण्यासाठी आणि जनतेला आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी पुढेही झपाट्याने काम करत राहीन.या महत्त्वपूर्ण निर्णयासाठी घेतलेल्या तातडीच्या कारवाईबद्दल आणि आमच्या मागण्यांची दखल घेतल्याबद्दल पुन्हा रेल्वेमंत्री अश्विनी नाईक यांचे मनःपूर्वक आभार!**

**-खासदार सुनील तटकरे**


Wanted Civil Engineer for Industrial Project at Khopoli

B.E. (Civil) or Diploma Holder

5 to 10 years Experience

Send your CV on following email id.

roykb55@gmail.com

nawabmaslam@hotmail.com


# पोस्को एशिया फेलोशिप पुरस्कार सोहळा २०२४

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरे येथे संपन्न

**माणगाव : प्रतिनिधी, बातमीदार**

पोस्को टी. जे. पार्क फाऊंडेशन आणि पॉस्को महाराष्ट्र स्टील यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पोस्को एशिया फेलोशिप पुरस्कार सोहळा २०२४ हा एक प्रेरणादायी सोहळा २ डिसेंबर २०२४ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे येथे पार पडला. हा सोहळा विद्यापीठासाठी एक अभिमानाचा क्षण ठरला, जिथे १५ विद्यार्थ्यांना त्यांच्या मेहनती, अभ्यासू वृत्ती आणि उत्कृष्ट शैक्षणिक कामगिरीसाठी सन्मान करण्यात आला.





या सोहळ्याला पोस्को टी. जे. पार्क फाऊंडेशनचे प्रमुख ओह यंग डल हे दक्षिण कोरियाहून विशेष उपस्थित होते आणि पोस्को महाराष्ट्रचे स्टील चे मुख्य व्यवस्थापकीय संचालक किम दे अप, विद्यापीठाचे मान्यवर कुलगुरू, प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावर्षी निवड झालेल्या १५ विद्यार्थ्यांना या सोहळ्यात प्रमाणपत्र, स्मृतीचिन्ह आणि ८०० अमेरिकन डॉलर्स प्रदान करण्यात आले. २०१५पासून सुरू असलेल्या या उपक्रमात आत्तापर्यंत १००पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना याचा लाभ मिळाला आहे. या फेलोशिपसाठी निवड होणे हे सहज शक्य नव्हते; विद्यार्थ्यांना मेहनतीच्या सर्वोच्च स्तरावर पोहचावे लागते. सतत अभ्यास, आत्मविश्वास, आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळेच या फेलोशिपसाठी पात्र ठरता येते. आत्तापर्यंत ही फेलोशिप विद्यार्थ्यांसाठी एक नवी दिशा आणि प्रेरणा देणारी ठरली आहे.

पोस्को टी. जे. पार्क फाऊंडेशनचे प्रमुख ओह यंग डल यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना सांगितले, पोस्को फेलोशिप मिळवणे हे मेहनतीचे प्रतीक आहे. यासाठी कठीण परिश्रम आणि दृढ निश्चयाची आवश्यकता आहे. तुमची स्वप्ने मोठी असली पाहिजेत, आणि त्यांना साकार करण्यासाठी तुम्ही कोणतीही कसर ठेवू नका. हा तुमचा पहिला टप्पा आहे, आता आयुष्यात आणखी मोठे यश मिळवा.

विद्यार्थ्यांचे अनुभव हे कार्यक्रमाचे आणखी एक वैशिष्ट्य होते. अनेक विजेत्यांनी व्यासपीठावरून आपले अनुभव सांगितले - ज्या कठीण प्रसंगांवर मात करून त्यांनी हे यश मिळवले, या प्रेरणादायी कहाण्यांनी सगळ्यांना पुढे जाण्यासाठी नवीन जोम मिळवून दिला.

डीन प्रा. अरविंद किवेळेकर यांनी पोस्को महाराष्ट्रचे कंपनीचे आभार मानले व सांगितले की, पोस्को सारख्या जागतिक पातळीवरील संस्थेने आमच्या विद्यार्थ्यांना असा मंच उपलब्ध करून दिला, ही आमच्यासाठी खूप मोठी गोष्ट आहे. यामुळे विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी, मेहनत करण्यासाठी आणि मोठी स्वप्ने पाहण्यासाठी नवी प्रेरणा मिळाली आहे.

श्रीया पाटील हिने मनोगत व्यक्त करतांना सांगितले की, पोस्को एशिया फेलोशिप आमच्यासाठी एक संधी आहे जी आम्हाला पुढे शिकण्यासाठी आणि आमच्या ध्येयांकडे आत्मविश्वासाने जाण्यासाठी मदत करेल. ही फेलोशिप मिळवणे सोपे नव्हते, पण मेहनतीने ते शक्य झाले.

पॉस्को एशिया फेलोशिप पुरस्कार सोहळा हा केवळ एक पुरस्कार सोहळा नव्हता, तर विद्यार्थ्यांसाठी एक प्रेरणादायी व्यासपीठ ठरले. हा कार्यक्रम मेहनतीचे महत्त्व पटवून देत पोस्कोच्या शिक्षण क्षेत्रातील योगदानाचा ठळक प्रत्यय देतो. विद्यार्थ्यांनी भविष्यात आणखी मोठे ध्येय गाठण्यासाठी, कष्ट घेऊन पुढे जाण्याचा निर्धार केला.

# माथेरान वाल्मिकी नगरात महाभंडारा

**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरानमध्ये युवा रुखी गुजराथी समाजाच्या वतीने श्री अंबे मातेच्या पूजेनिमित्ताने मंगळवारी (दि.१७) वाल्मिक नगरात वाल्मिकी युवा रुखी गुजराथी समाजाच्या बांधवांकडून महाभंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी भाजप माजी नगरसेवक चंद्रकांत जाधव, शिवसेना शिंदे गटाचे माजी नगरसेवक शिवाजी शिंदे, उपशहर प्रमुख प्रमोद नायक, निखिल शिंदे, प्रकाश सुतार, जनार्दन पार्टे, नरेश परदेशी आदी उपस्थित होते.

गौरांग वाघेला, दीपक पुरबिया, अंबालाल वाघेला, राजेश वाघेला, छगन पुरबिया,कांती पुरबिया, संतोष लखन, नरेश पुरबिया आदींनी कार्यक्रम यशस्वी केला.


**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**e-TENDER NOTICE –**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website https:// srmetender.mahatransco.in/ for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. Cost |
|---|---|---|
| Tend-47/24-25 RFX 7000034611 | Work of construction 1 No. of 22kV feeder for M/s Bharat Petroleum Ltd. plant at 220kV Uran substation under EHV (O&M) Division Panvel. | Rs. 88.95 Lakhs |

EMD 1% of estimated cost. **Submission of bids from 18.12.2024 to 02.01.2025 up to 11:00 hrs, Opening date:- 02.01.2025 @ 11:30 Hrs. Tender Fee- Rs. 500/- + GST** For further details visit our website https://srmetender.mahatransco.in/ Contact Person: The Executive Engineer (Adm) Tel No. 022-27459624, Mob. No. 9769006131 E-mail ID se7200@mahatransco.in

**Sd/-**

**SUPERINTENDING ENGINEER EHV (O&M) CIRCLE, PANVEL**



JANARDAN BHAGAT SHIKSHAN PRASARAK SANSTHA'S

**RAMSHETH THAKUR PUBLIC SCHOOL,ULWE**

**U-DISE NO- 27244100042 I PROPOSED C.B.S.E. SCHOOL**

**Plot No.01, Sector-12, Ulwe, Tal-Panvel, Dist-Raigad-410 206 Ph. 7710090800 / 7710072762**

**STAFF RECRUITMENT**

**Applications are invited for the following posts for the Academic Year 2025-26 for immediate appointment.**

| Posts | Qualifications |
|---|---|
| **Principal (1)** | Post Graduate and B.Ed/M.Ed. from recognised university with 10 years of teaching experience and 5 years in administrative position in a CBSE School |
| **Co-ordinator (1)** | Post graduate with B.Ed. having 5 years of experience in CBSE school of which 2 years in school administration handling primary classes |
| **Pre-Primary Teacher (4)** | HSC/Graduate/Post graduate with ECCED/ PTC/Montessori Course with minimum 2 years of experience in a CBSE school |
| **TGT- (5)** **English – 1** **Maths - 1** **Hindi & Marathi – 1** **S.S.T. – 1** **Science – 1** | Graduate/post graduate with at least 50% marks, Bachelor of Education (B.Ed.) with teaching experience in a CBSE school at primary & secondary Preferred CTET qualified teachers. Must have knowledge of working on Computer. |
| **PRT (6)** **English - 1** **Hindi - 1** **Marathi - 1** **Mathematics – 1** **Science - 1** **Social Science - 1** | Graduate/post graduate with at least 50% marks, Bachelor of Education (B.Ed.) with teaching experience in a CBSE school at primary & secondary Preferred CTET qualified teachers. Must have knowledge of working on Computer. |
| **Computer Teacher (1)** | B.Sc./ M.Sc. IT/ CS or BCA/MCA/BE from a recognized university with minimum 2 years of teaching experience in CBSE school. Preference will be given to CTET qualified teachers. |
| **Sports Teacher (1)** | B.P.Ed/ M.P.Ed. (from recognized university) |
| **Music Teacher (1)** | Bachelor Degree in Music/ Sangeet Visharad or equivalent from a recognized University |
| **Counselor (1)** | Clinical Psychologist, R.C.I. Registered. |
| **Special Educator (1)** | P.G./ Diploma in Child Psychology. |
| **Librarian ( 1)** | B.Lib/ M.Lib |

**Only those candidates who have passed Std. X from an English medium School should apply for Teaching Post.**

**Note:** Interested candidate can send their resume with passport size photograph and self- attested copies of documents to Chairman, JBSP Sanstha at, **Ramsheth Thakur Public School, Ulwe. Plot No:1, Sector-12, Ulwe- Tal: Panvel, Dist: Raigad - 410206.** Candidate may also submit the application by mail to **rtpsulwe@gmail.com** on or before **Friday 3rd January 2025**

For Additional Information Contact:

1. **Mrs. Chashminder Bakshi – 7977498174**
2. **Mrs. Sonal S. Mokal - 7045299876**

**Shri. Ramsheth Thakur (Ex. M.P.)**

Chairman, Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha, Panvel



JANARDAN BHAGAT SHIKSHAN PRASARAK SANSTHA'S

**RAMSHETH THAKUR PUBLIC SCHOOL, KHARGHAR**

**U-DISE 27240806133, CBSE SCHOOL I AFFILIATION NO: 1130299**

**Plot No.11/ 11A, Sector-19, Kharghar, Tal-Panvel, Dist-Raigad- 410210**

**STAFF RECRUITMENT**

**Applications are invited for the following posts for the Academic Year 2025-26 for immediate appointment**

| Posts | Qualifications |
|---|---|
| **TEACHING STAFF** | |
| **PGT- (01)** **Accountancy – 1** **Business Studies - 1** | Post graduate with at least 50% marks, Bachelor of Education (B.Ed.) with teaching experience in a CBSE school at primary & secondary Preferred CTET qualified teachers. Must have knowledge of working on Computer. |
| **TGT – (6)** **English – 1** **Science – Phy/Chem/ Scie-2** **S.S.T. -1** **Computer – 1** | Graduate/post graduate with at least 50% marks, Bachelor of Education (B.Ed.) with teaching experience in a CBSE school at primary & secondary Preferred CTET qualified teachers. Must have knowledge of working on Computer. |
| **PRT (17)** **English - 3** **Hindi -1** **Marathi - 1** **Mathematics - 4** **Science - 2** **Social Science – 1** **Computer – 1** **A.I./Robotics-1** **Physical Educator-1** **Art - 2** | Graduate/post graduate with at least 50% marks, with teaching experience in a CBSE school at primary & secondary Must have knowledge of working on Computer. B.P.Ed for Physical Education Teacher. |
| **PRE-PRIMARY –(2)** | HSC / Graduate, E.C.C. Ed / Montessori with teaching experience in a CBSE school at primary & secondary. Must have knowledge of working on Computer. |
| **NON - TEACHIING** | |
| **SR. CLERK- 1** | B.Com./M.Com. with 2 years of experience in maintenance of school A/C using tally, |
| **NURSE -1** | Diploma in Nursing from a recognised institution and experience of Working in a school. |

**Only those candidates who have passed Std. X from an English medium School should apply for Teaching Post.**

**Note:** Interested candidate can send their resume with passport size photograph and self- attested copies of documents to Chairman JBSP Sanstha at, Plot no. 11 & 11A, Sector-19, Kharghar, Navi Mumbai – 410210.

Candidate may also submit the application by email to **rtpskhgr@gmail.com** before the last date **Friday 3rd January 2025**

**For Additional Information Contact:**
**9821537023, 9870891020, 022-27744410, 022-68574410**

**Shri. Ramsheth Thakur (Ex. M.P.)**

Chairman, Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha, Panvel.


# नागोठणे शाळेतील पटसंख्या वाढत असल्याचा अभिमान -नरेंद्र जैन

**नागोठणे : प्रतिनिधी**

शिक्षण क्षेत्रातील स्पर्धेच्या युगात मराठी माध्यमाच्या शाळेतील विध्यार्थ्यांची पटसंख्या दिवसेंदिवस घटत असली तरी बापूसाहेब देशपांडे विद्यासंकुलातील विध्यार्थ्यांची पटसंख्या दिवसेंदिवस वाढत असल्याचा मला अभिमान असल्याचे शाळा समितीचे अध्यक्ष नरेंद्रशेठ जैन यांनी सांगीतले.

नागोठणे येथील कोएसोच्या बापूसाहेब देशपांडे विद्यासंकुलाच्या वार्षिक स्नेहसंमेलनाचे औचित्य साधून घेण्यात आलेल्या पारितोषिक



वितरण समारंभा प्रसंगी विध्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना नरेंद्रशेठ जैन यांनी कोएसोचे अध्यक्ष सिद्धार्थ पाटील व मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक खोपकर यांचे कुशल मार्गदर्शन व गुरुजनांकडून देण्यात येणाऱ्या चांगल्या पद्धतीच्या शिक्षणामुळे येथील विध्यार्थ्यांची पटसंख्या दिवसेंदिवस वाढत असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी वार्षिक स्नेहसंमेलनाचे औचित्य साधून रांगोळी, चित्रकला व विज्ञान प्रदर्शनाचे उदघाटन व आकाशी झेप घेरे पाखरा यातील विध्यार्थ्यांना यशस्वी होण्यासाठी प्रोत्साहन देणाऱ्या झेप या हस्त लिखिताचे प्रकाशन तसेच पाहिली ते बारावीच्या गुणवंत विध्यार्थ्यांचा गुणगौरव अध्यक्ष नरेंद्र जैन यांच्या हस्ते करण्यात आले.

या पारितोषिक वितरणा प्रसंगी शाळा समितीचे अध्यक्ष नरेंद्र जैन, प्राथमिकचे अध्यक्ष अनिल काळे, सदस्य ॲड. सोनल जैन, जयराम पवार, राजेंद्र जैन, सुभाष जैन, महाविद्यालयाच्या मुख्याध्यापिका राधिका ठाकूर, प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका अनघा लोखंडे आदी उपस्थित होते.

# ‘एनएमएमटी’तील ट्रॅकिंग प्रणाली जुनाट

## ◆ प्रवाशांना मनस्ताप ◆ आधुनिकीकरण गरजेचे



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

एनएमएमटीत असणारी ट्रॅकिंग प्रणाली जुनाट असल्याने नव्याने दाखल झालेल्या इलेक्ट्रिक बसची वारंवारिता (फ्रिक्वेंसी) जुळत नाही. परिणामी या बस एनएमएमटी ॲपवर तसेच थांब्यावरील डिजिटल फलकावरही दिसत नाहीत. प्रणालीचे आधुनिकीकरण गरजेचे आहे, मात्र निधी तांत्रिक प्रक्रियेत अडकला आहे. त्यामुळे प्रवाशांना मनस्ताप सहन करावा लागत आहे.

एनएमएमटी सेवेत गेल्या काही वर्षांपासून ट्रॅकिंग प्रणालीत चुका होत असल्याचा आरोप होत आहे. काही वर्षांपासून १०० बस थांब्यावर डिजिटल फलक लावण्यात आले आहेत. यावर बस कधी येणार व सध्या त्या नेमक्या कुठे आहेत हे दर्शविले जाते. सद्यस्थितीत हे फलक वारंवार खराब होत आहेत. तसेच अनेक बसमध्ये ट्रॅकिंग प्रणाली व्यवस्थित काम करीत नसल्याने त्या बसची माहिती बस थांबा किंवा पवर दिसत नव्हती. करोना काळानंतर अनेक महिने ॲप बंद पडला होता. काही महिन्यांपूर्वी तो पूर्ववत करण्यात आला.

सुमारे दीड महिन्यापूर्वी एनएमएमटीच्या ताफ्यात नव्याने २५ गाड्या दाखल झाल्या आहेत. या सर्व गाड्या इलेक्ट्रिक बस असून या बसमध्ये ४ जी आणि ५ जी ही आधुनिक प्रणाली आहे. त्यामुळे त्याला ट्रॅकिंग प्रणाली वर जोडायचे असल्यास जोडणारी आणि कार्यरत असणारी प्रणालीसुद्धा आधुनिक असणे गरजेचे आहे, मात्र सध्या एनएमएमटीकडे २ जी वर चालणारी आयटीएमएस (इंटिग्रेटेड ट्रान्सपोर्ट मॅनेजमेन्ट सर्व्हिस) ही प्रणाली आहे. ही प्रणाली कालबाह्य असल्याने नवीन प्रणालीची फ्रिक्वेंसी जुळत नाही. परिणामी नव्याने दाखल झालेल्या बसबाबत माहिती डिजिटल फलक व प वर दिसत नाहीत.

### निधीसाठी पाठपुरावा

*आयटीएमएस (इंटिग्रेटेड ट्रान्सपोर्ट मॅनेजमेंट सिस्टीम ) ९ कोटी खर्च करून २०१८ मध्ये कार्यान्वित झाली. अद्ययावतीकरणाच्या निधीसाठी एनएमएमटीने एमओआरटीएच (सडक परिवहन राज मार्ग मंत्रालय) यांना अनेकदा पत्र पाठवले असून दोन वेळा स्मरण पत्रही पाठवलेले आहे*

**“ नव्याने दाखल झालेल्या बस या १२५ क्रमांकाने मार्गावर धावत आहेत. सीबीडी ते बोरीवली आणि खारघर ते बोरीवली असा हा मार्ग असून या मार्गाला उत्तम प्रतिसाद मिळत आहे. याच मार्गावर जाणारे प्रवासी सर्वाधिक ॲपचा वापर करतात तर डिजिटल फलकाचाही फायदा मोठ्या प्रमाणात होतो. आता मात्र ॲप आणि फलकावर बसबाबत माहिती मिळत नसल्याने मनस्ताप होतो.**

**–प्रवीण लोढा**, प्रवासी

**“ प्रणालीचे वेळोवेळी आधुनिकीकरण करणे क्रमप्राप्त असतानाही प्रशासनाकडून लक्ष दिले न गेल्याने सुरुवातीपासून २ जी बेस प्रणाली आहे, तीच आजतागायत वापरात येते. आता वरचेवर आधुनिक पद्धती येत असताना त्याचे अपग्रेडेशन आवश्यक आहे. ते करण्याबाबत उदासीनता दिसून येते. याचा त्रास प्रवाशांना होतोच मात्र शासनाने अशा प्रणालींना दिलेले पैसेही वाया जातात.**

**–समीर बागवान**, माजी परिवहन सदस्य

**“ एमओआरटीएचने नुकताच प्रतिसाद दिला आहे. लवकरच याबाबत सादरीकरण केले जाणार असून त्यानंतर निधी लवकर मिळेल अशी आशा आहे.**

**–योगेश कडुसकर**,व्यवस्थापक, एनएमएमटी

# नमस्ते योजनेद्वारे सफाई मित्रांसाठी विशेष कार्यशाळा

**नवी मुंबई : बातमीदार**

राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त आणि विकास महामंडळाद्वारे ‘नमस्ते’ योजनेंतर्गत नवी मुंबई महानगरपालिकेच्या सफाईमित्रांसाठी महानगरपालिका क्षेत्रातील मलनि:स्सारण वाहिन्या व सेप्टिक टँक यांची सुरक्षित साफसफाई या विषयाबाबत विशेष कार्यशाळा नमुंमपा मुख्यालयातील ज्ञानकेंद्रात झाली.

महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली अत्यधुनिक यंत्रणा वापरून शहर स्वच्छतेवर भर दिला जात असतानाच शहर स्वच्छतेसाठी झटणाऱ्या स्वच्छतामित्र व सफाईमित्रांच्या आरोग्याकडेही विशेष लक्ष दिले जात आहे.

याचाच एक भाग म्हणून केंद्र सरकारच्या ‘नमस्ते’ योजनेंतर्गत सफाईमित्रांसाठी आयोजित करण्यात आलेली ही विशेष कार्यशाळा प्रातिनिधीक स्वरुपातील ५०हून अधिक सफाईमित्र यांच्या सहभागातून यशस्वीरित्या झाली.

राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त आणि विकास महामंडळ यांच्या वतीने जेनरोबोटिक इनोव्हेशन यांच्या माध्यमातून ही कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेमध्ये मलनि:स्सारण वाहिन्या व सेप्टिक टँक सुरक्षितरित्या सफाई करण्याची गरज विशद करण्यात आली तसेच त्याकरिता असलेल्या नियमांची व कायद्यांची माहिती देण्यात आली.

मॅनहोलची सफाई पध्दत पूर्णपणे बंद करुन मशीनहोल सफाईचा अंगिकार करण्याच्या कायद्याविषयी माहिती देताना नवी मुंबई महानगरपालिका कायदा होण्याच्या आधीपासूनच मशीनहोल सफाईला प्राधान्य देत असल्याबद्दल जेनरोबोटिकच्या प्रशिक्षकांनी प्रशंसा केली.

या वेळी सुरक्षा साधने व सुरक्षित यंत्रसामुग्री यांचीही सविस्तर माहिती प्रशिक्षकांनी दिली. सफाईमित्रांच्या सक्षमीकरणासाठी केंद्र सरकारमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती देत प्रशिक्षकांनी स्वच्छता उद्यमी योजनेंतर्गत सफाई मित्रांना कर्ज स्वरुपात वित्त पुरवठा केला जातो त्याची सविस्तर माहिती दिली. त्यासोबतच ‘नमस्ते’ आणि ‘दक्ष’ उपक्रमांतर्गत करण्यात येणाऱ्या कामाची माहिती दिली.

अतिरिक्त शहर अभियंता अरविंद शिंदे यांच्या नियंत्रणाखाली, कार्यकारी अभियंता दीपक सूर्यराव, कनिष्ठ अभियंता दिलीप बेनके व वैभव देशमुख यांनी कार्यशाळेचे यशस्वी आयोजन केले. मलनि:स्सारण व्यवस्थापनाप्रमाणेच हा स्वच्छ सर्वेक्षणाचा भाग असल्याने तसेच स्वच्छ सर्वेक्षणांतर्गत सध्या स्वच्छ शौचालय अभियान सुरू असल्याने यामध्ये घनकचरा व्यवस्थापन विभागानेही महत्वाचा आयोजन सहभाग घेतला.



# देश का प्रकृती परीक्षण अभियानाबाबत आवाहन

**नवी मुंबई : बातमीदार**

केंद्रिय आयुष मंत्रालयाच्या वतीने दि. २६ नोव्हेंबर २०२४ ते २५ डिसेंबर २०२४ या कालावधीत ‘देश का प्रकृती परीक्षण’ हे अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानात ‘आयुष’ मंत्रालयांतर्गत असलेली महाविद्यालये आणि रुग्णालयातील वैद्य, स्वयंसेवक आपल्याकडे येऊन संबंधित प्रकृती परीक्षण करतील अशी माहिती पोदार वैद्यक महाविद्यालया (आयु)चे अधिष्ठाता यांनी दिली आहे.

देशभरातील संपूर्ण जनतेचे प्रकृती परीक्षण करून प्रकृतीनुसार आहार कोणता घ्यावा, दैनंदिन जीवनशैली कशी असावी. याबद्दल मार्गदर्शन देण्यासाठी केंद्रिय आयुष मंत्रालयाच्या वतीने संपूर्ण देशभरात ‘देश का प्रकृती परीक्षण’ हे अभियान राबाविण्यात येत आहे.

आयुष मंत्रालयांतर्गत महाविद्यालये आणि रुग्णालयातील वैद्य आणि स्वयंसेवकांव्दारे हे परीक्षण करण्यात येत असून, या परीक्षणात प्रकृतीनूसार संभाव्य व्याधी कोणत्या होऊ शकतात, ऋतू बदलामध्ये कोणता आहार–विहार घ्यावा. या संबंधीचे मार्गदर्शन दिले जात आहे. प्रकृती परीक्षण झाल्यावर संबंधीतांना विनामुल्य प्रकृती प्रमाणपत्र दिले जाते.

संपूर्ण देशाच्या स्वास्थाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण अशा या अभियानात आयुष मंत्रालयांतर्गत येणाऱ्या महाविद्यालये आणि रुग्णालयातील वैद्य, स्वयंसेवक आपल्याकडे येऊन प्रकृती परीक्षण करतील त्यांना आपले सक्रीय योगदान आणि सहकार्य करा तसेच या अभियानात मोठ्यासंख्येने भाग घ्या, असे आवाहन रा.आ. पोदार महाविद्यालय (आयु) वरळी मुंबईचे अधिष्ठाता वैद्या संपदा संत यांनी एका प्रसिध्दी पत्रकाव्दारे केले आहे.

# वीर वाजेकर कॉलेजमध्ये बुकमार्क प्रदर्शन

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील फुंडे येथील रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर कॉलेजमध्ये इंग्रजी विभाग आणि ग्रंथालय विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने बुकमार्क प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते.

दोन्ही विभागांच्या संयुक्त विद्यमाने बुकमार्क बनवणे कार्यशाळा १२ डिसेंबर २०२४ रोजी आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेस विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद देऊन आपली कौशल्य वापरत विविध प्रकारचे बुकमार्क बनवले. या वेळी बनवलेल्या उत्कृष्ट बुकमार्कचे प्रदर्शनसोमवार (दि.१६ )रोजी आयोजित करण्यात आले होते.




बुकमार्क प्रदर्शनाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ.आमोद ठक्कर सर यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी मनोगत व्यक्त करताना प्र.प्राचार्य ठक्कर म्हणाले की, बुकमार्क प्रदर्शनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळतो, तसेच अशा कल्पनांच्या माध्यमातून उद्योजकतेची बीजे देखील रोवली जातात. याशिवाय या प्रकारचा उपक्रम वार्षिक पारितोषिक कार्यक्रमात देखील आयोजित करण्यात यावा, असे त्यांनी सुचित केले.

प्रदर्शनाच्या यशस्वीतेसाठी इंग्रजी विभाग प्रमुख प्रा. बळीराम पवार, ग्रंथपाल सुप्रिया नवले, इंग्रजी विभागातील प्रा. रश्मी पुरके मॅडम व प्रा. अश्फिया उंदरे मॅडम तसेच ग्रंथालयीन कर्मचारी बंगारे व नर्मदा खरपडे यांनी सहकार्य केले. प्रदर्शनास महाविद्यालयातील विविध विभागांचे प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी उत्साहाने भेट दिली.

# फडके विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न झाले. ’मनोहरम – कृष्ण लीला’ या सूत्रावर आधारित कार्यक्रमात श्रीकृष्णाच्या जीवनावर आधारित विविध प्रसंग विद्यार्थ्यांनी सादर केले.

इयत्ता पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी उत्साहाने भाग घेत कृष्णाच्या बाललीलांपासून ते गीता–उपदेशापर्यंतचे विविध प्रसंग प्रभावीपणे सादर केले. पनवेल येथील पटेल ज्वेलर्सचे



डायरेक्टर नवनीतजी पटेल यांच्या हस्ते स्नेहसंमेलनाचे उद्घाटन करण्यात आले. त्यांनी विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाची प्रशंसा करत कार्यक्रमाच्या आयोजकांचे कौतुक केले.

या वेळी वर्षभरातील विविध स्पर्धांमध्ये यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना तसेच पालकांना मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. सुमारे पाच हजार वर्षांपूर्वी श्रीकृष्णाने दिलेले उपदेश आजच्या युगातही किती उपयोगाचे आहेत व त्यांचा अवलंब केल्यास जीवनातील अनेक समस्यांवर मात करता येते व सकारात्मकता प्राप्त करता येते, असे मत प्रमुख पाहुण्यांनी आपल्या भाषणात मांडले.

श्रीकृष्णाच्या जीवनावर आधारित हा अनोखा संस्कृतीदर्शक कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी आदर्श ठरून उज्वल चरित्र, योग्य – अयोग्य यातील फरक जाणणे याकरिता प्रेरणादायक अनुभव ठरेल, अशी आशा इंग्रजी माध्यम, माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका मनीषा महाजन यांनी आपल्या प्रास्ताविकामधे केली. शितल साळुंखे यांनी उपस्थितांचे आभार मानले. संपूर्ण वंदे मातरम गायनाने या स्नेहसंमेलनाची सांगता झाली.

# बालवैज्ञानिक स्पर्धेत ‘विद्याभवन’चे यश

**नवी मुंबई : बातमीदार**

ग्रेटर बॉम्बे सायन्स टीचर्स असोसिएशनने ३० नोव्हेंबर २०२४ रोजी आयोजित केलेल्या डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा २०२४–२५ मध्ये विद्याभवनच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश मिळविले आहे. इयत्ता ६ मधील ७ विद्यार्थी आणि इयत्ता ९ वी चे ३ विद्यार्थी परीक्षा यशस्वीपणे उत्तीर्ण झाली. त्यामध्ये इयत्ता ६ मधील श्रीया धांद्रुत व मिहीर मिरजे आणि

इयत्ता ९ मधील तन्मय लकुम आर्या नात्ती या विद्यार्थ्याने



लेखी परीक्षेत गुणवत्ता क्रमांक मिळवला आणि प्रात्यक्षिक परीक्षेसाठी पात्र ठरले आहेत. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आणि त्यांच्या मार्गदर्शक शिक्षकांचे पुणे विद्यार्थी गृह संस्थेचे कार्याध्यक्ष राजेंद्र बोऱ्हाडे कुलसचिव दिनेश मिसाळ मुख्याध्यापिका श्रीजा नायर, सुवर्णा मिसाळ, मनीषा मुळीक आणि मुख्याध्यापक जी.आर. कदम, समन्वयक पी. बी. मुळीक , सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व त्यांना आगामी प्रात्यक्षिक परीक्षेत यशासाठी शुभेच्छा दिल्या.

# चिरनेर व मोठीजुई येथे केंद्रस्तरीय क्रीडा व व्यक्तिमत्व विकास स्पर्धा



**उरण : वार्ताहर**

उरण पंचायत समिती शिक्षण विभागाच्या वतीने केंद्रस्तरीय क्रीडा व व्यक्तिमत्त्व विकास स्पर्धा, राजिप प्राथमिक केंद्र शाळा चिरनेर व राजिप आदर्श शाळा मोठीजुई येथे सोमवार (दि.१६) व मंगळवार (दि.१७) झाली.

या केंद्रस्तरीय स्पर्धेत, चिरनेर केंद्रात येणाऱ्या १२ प्राथमिक शाळांनी भाग घेतला होता. यात सांघिक नृत्य स्पर्धेत चिरनेर ग्रामपंचायत हद्दीतील चांदायली आदिवासीवाडी प्राथमिक शाळा प्रथम क्रमांकाची मानकरी ठरली. तर चिरनेर प्राथमिक केंद्र शाळेने सांघिक नृत्य स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकाविला. तसेच समूहगीत स्पर्धेत चिरनेर प्राथमिक केंद्र शाळा प्रथम पुरस्काराची मानकरी ठरली. पथनाट्य स्पर्धेतही चिरनेर प्राथमिक केंद्र शाळेने प्रथम क्रमांकाचेच पारितोषिक पटकाविले. तर शाडू मातीपासून शिल्प तयार करण्याच्या स्पर्धेत चिरनेर प्राथमिक केंद्र शाळेचे विद्यार्थी साई अजित मोकल (प्रथम) व जिज्ञा खंडू पिचड(द्वितीय) क्रमांकांनी विजयी झाले.

विजेत्या स्पर्धकांना शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सचिन म्हात्रे, उपाध्यक्ष गौरवी पाटील, सदस्य हिम्मत केणी, केंद्रप्रमुख अविनाश नवाळे, मुख्याध्यापक विश्वनाथ गावंड तसेच शाळा व्यवस्थापन समितीच्या अन्य सदस्यांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली.

स्पर्धा यशस्वी करण्यासाठी उपशिक्षक बळीराम पाटील, सुरेश पाटील, रोशन थळी, शिवप्रसाद पंडित, पल्लवी कांबळे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# चिरनेर येथे स्वर प्रल्हादाचे कार्यक्रम

**उरण : वार्ताहर**

चिरनेर कातळपाडा येथे दत्त जयंती उत्सवानिमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या श्री सत्यनारायणाच्या महापूजेचे औचित्य साधून, येथील रसिक प्रेक्षकांच्या मनोरंजनासाठी महाराष्ट्राचे लोकप्रिय गायक चंद्रकांत शिंदे यांच्या स्वर प्रल्हादाचे या भावगीते, भक्तिगीते व लोकगीतांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी स्वर सम्राट चंद्रकांत शिंदे यांनी वडील स्वर्गीय महागायक प्रल्हाद शिंदे यांच्या आठवणी जागविल्या. या वेळी नमिला गणपती माऊली शारदा, गजानना श्री गणराया आधी वंदू तुज मोरया, तूच सुखकर्ता, तूच दुःखहर्ता, बाप्पा मोरया चरणी ठेवितो माथा, मंगल वेढे भूमी संतांची, ऐका सत्यनारायणाची कथा, विठ्ठलाच्या पायी वीट झाली भाग्यवंत, गेला हरी कुण्या गावा, करू या उदो उदो अंबाबाईचा, साईबाबा मी शिर्डीला पायी चालत येईन, सोन्याचं बाशिंग लगीन देवाचं लागत, कधी लागेल रे वेड्या तुला गोडी अभंगाची, उड जायेगा दिल, रहेगा पिंजरा खाली, जगी जीवनाचे सार, येळकोट येळकोट जय मल्हार, जय विठ्ठल विठ्ठल जय हरी, उडतो डोळा, डोळा बाई डावा, आई तुझ देऊळ, चल ग सखे चल ग सखे पंढरीला, पाऊले चालती पंढरीची वाट अशा अंगात वेगळ्याच ऊर्जेची जाणीव करून देणाऱ्या गीतांचे सादरीकरण करण्यात आले.

चिरनेरचे प्रख्यात गायक सुरज कमळाकर पाटील यांनाही स्वर प्रल्हादाचे या कार्यक्रमात गायनाची संधी दिली. त्यांनीही आपल्या गायिकेतून भावगीतांना न्याय दिला.



# रात्री सिग्नल देणाऱ्या बोटी कोणाच्या?

## श्रीवर्धनमधील नागरिकांमध्ये भितीचे वातावरण

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन, एक शांत आणि सुरक्षेचे प्रतीक असलेला समुद्रकिनारा आहे. दोन ते तीन दिवसांपासून, समुद्रकिनाऱ्यावर रात्रीच्या वेळी किंवा पहाटेच्या वेळी लाल रंगाचे सिग्नल देणारी बोटी दिसत आहेत. किमान चार ते पाच वेळा या बोटी लाल रंगाचा सिग्नल देताना पाहिल्या गेल्या असून, यामुळे नागरिकांमध्ये शंका आणि भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.



मुंबईमध्ये १९९३ साली झालेल्या स्फोटाचे आरडीएक्स श्रीवर्धन शेजारच्या किनाऱ्यावर उतरवले गेले होते, त्याचा परिणाम अत्यंत भयानक झाला होता. या घटनेत हजारो निष्पाप लोकांचा जीव गेला होता. त्या वेळी श्रीवर्धन तालुका जागतिक नकाशावर आला होता. आज यामुळे श्रीवर्धनच्या समुद्रकिनाऱ्याबद्दल लोकांच्या मनात असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. काही महिन्यांपूर्वी समुद्रकिनाऱ्यावर चरसच्या पिशव्या सापडल्या होत्या. या सर्व घटनांमुळे श्रीवर्धनच्या समुद्रकिनाऱ्याचा वापर काळाबाजार करण्यासाठी होतोय का, अशी नागरिकांमध्ये चर्चा आहे.

श्रीवर्धनमध्ये सध्या नागरिकांत या लाल सिग्नल देणार्या बोटींविषयी अनेक तर्कवितर्क निर्माण झाले आहेत. याविषयी श्रीवर्धनचे पोलीस निरीक्षक रिकामे साहेब यांच्याकडे संपर्क साधला असता, त्यांनी या संदर्भात माहिती घेत असल्याचे सांगितले.

तथापि, रात्री ११ वाजता या सिग्नल्सच्या माहितीबद्दल सागरी पोलीस अधिकाऱ्यांकडून पहातो बघतो, अशी प्रतिक्रिया प्राप्त झाली आहे.

यामुळे श्रीवर्धनमध्ये पुन्हा एकदा भयंकर घटनेची पुनरावृत्ती होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. प्रशासनाने तात्काळ याची दखल घेणे आवश्यक आहे. प्रशासन आणि सागरी पोलीस यांना या संदर्भात ठोस आणि परिणामकारक उपाययोजना कराव्यात, अशी नागरिकांची मागणी आहे.

# खोरा बंदरातील नूतन जेटीचे काम निकृष्ट दर्जाचे

## खराबकामामुळे पर्यटकांना होणार त्रास

**मुरुड : रामप्रहर व्रुत्त**

मेरीटाईम बोर्डाने जंजिरा किल्यात जाणाऱ्या पर्यटकांसाठी ४०० वाहने पार्कींग होतील अशी एक कोटी खर्चून पार्किंग बनवली असुन आठ कोटी खर्चून नूतन जेटी तयार होत आहे, परंतु जेटीवरील रस्त्याच्या दोन्ही बाजूस सुरक्षा कठडे बांधण्यात आले त्यासाठी वापरण्यात आलेले लोखंडी पोल अतिशय गांजलेले आहेत.

मुरूडला पर्यटन विकासासाठी खोरा बंदर महत्वाचे ठिकाण आहे. जंजिरा किल्ला पाहण्यासाठी जलवाहतूक मोठ्या प्रमाणात होते. सलग सुटीत हजारो पर्यटक किल्ला पाहण्यासाठी येतात. त्यावेळी वाहतूक कोंडी होते.



जेटीवर मोठ्याप्रमाणात पर्यटक उंभे राहतात. त्यांच्या सुरक्षेसाठी बनणारे कठडे हे मजबूत हवेत कठडा तुटला तर अपघात होऊन पर्यटक खोल पाण्यात पडण्याची भीती आहे. त्यामुळे सुरू असणारे काम थांबवून चागंल्या प्रतीचे लोखंड वापरून लवकर काम पूर्ण करावे

**पत्रकारांनी माझ्याकडे खोरा बंदरातील खराब कामाची तक्रार केली आहे. तत्काळ पहाणी करून चुकीचे काम काढून चागंल्या दर्जाचे काम करण्याची जबाबदारी मेरिटाइम बोर्डाची आहे.**
**–सुधीर देवरे**
**मिरिटॉइम बोर्ड अधीकारी**

# खोपोली पोलिसांनी ७१ मोबाईल केले मालकांना परत

**चौक: प्रतिनिधी**

खोपोली पोलिसांनी ७१ मोबाईल कोकण परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक संजय दराडे यांच्या हस्ते खालापूर पोलीस ठाण्यात मुळ मालकांना देण्यात आले.

रायगड पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे व अपर पोलीस अधीक्षक अभिजित शिवतरे यांनी खालापूर उप विभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम यांना खोपोली पोलीस ठाण्यात हरवलेल्या, गहाळ झालेल्या मोबाईल तक्रारींची नोंद घेउन नव्याने शोध घेण्यासाठी आदेश दिले होते. उप विभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक शितल राऊत यांनी जानेवारी २०२४ ते १५ डिसेंबर २०२४ पर्यंत राज्यात आणि



परराज्यात शोध घेऊन १७८ पैकी ७१ मोबाईल चा शोध लावला. याची किंमत सुमारे १०,३८,४०० रुपये इतकी आहे.

प्रगटीकरणं पथकाचे पोलीस शिपाई अभिजित व्हरांबले आणि अमोल राठोड यांचे कौतुक विशेष पोलीस महानिरीक्षक कोकण परिक्षेत्र संजय दराडे यांनी केले. यावेळी रायगड पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे, उप विभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम, वरीष्ठ पोलीस निरीक्षक शितल राऊत, खालापूर पोलीस वरीष्ठ निरीक्षक सचिन पवार यांच्या सह मोबाईल धारक, पोलीस अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# माणगाव तालुक्यातील कालवा सफाईला दिरंगाई

## निर्माल्य प्लास्टीक पिशव्या कचऱ्याचा कालव्यात खच

**माणगांव : बातमीदार**

माणगाव तालुक्यात काळ प्रकल्पांतर्गत डोलवहाळ बंधाऱ्याचे पाणी डाव्या कालव्यातून दरवर्षी डिसेंबर महिन्यात साधारण १५ तारखे नंतर सोडले जाते. यंदा मात्र कालवा सफाईला अद्याप सुरुवात झालेली नाही. त्यामुळे यंदाही पाणी सोडण्यास दिरंगाई होणार आहे

कालव्यात मोठ्या प्रमाणात शेवाळ प्लास्टीक कचरा, झाडी झुडपाचे रान माजले असून, शहरात कालव्यात पाणी सोडलेले नसताना देखील पाणी दिसते हे सांडपाणी असल्याचे चित्र आहे. त्यामुळे डासांचे प्रमाणात ही प्रचंड वाढ होत आहे. कालव्याला पाणी सोडण्याआधी ही घाण काढून कालवा स्वच्छ करावा



अशी मागणी होत आहे. कालवा सफाईला दिरंगाई होत असल्याने शेतकर्यांनी नाराजी व्यक्त केली आहे यातच रब्बी हंगामातील पीक घेणारे शेतकरी कालव्याला पाणी कधी सुटणार याच्या प्रतिक्षेत आहेत.

माणगांव शहरात कालव्याचे अक्षरशः गटारं झाले असुन मोठ्या प्रमाणात त्यात प्लास्टीक, काच बाटल्या, हारतुरे, घरातील घाण, जुनेकपडे कालव्यालाच उकीरडा समजुन येथील अनेक सुशिक्षित नागरिक सकाळी मॉर्निंग वॉकच्या बहाण्याने, घरातील निर्माल्याच्या रंगबिरंगी प्लास्टीक पिशव्या भक्तीपूर्ण अंतःकरनाने वाहत्या पाण्यात कोणताही विचार न करता सहजी सोडतात.

जलद गतीने यांत्रीक सफाई करताना जर या कालव्याच्या तळाची माती उखडली गेली तर पाणी गळतीच्या समस्येलाही सामोरे जावे लागते. शहरातील कालव्याला आतुन व्यवस्थित पिचींग बांधकाम करण्याचीच आवश्यकता आहे. कालव्यातील पाणी उन्हाळ्यात पाण्याची कमतरता असताना नदीत सोडले जाते व ते माणगांवकरांना पिण्यासाठी वापरात येते. पाण्याचे प्रदुषण ही गंभीर समस्या होणार आहे.

# मध्य रेल्वेच्या ९ कर्मचाऱ्यांना महाव्यवस्थापक संरक्षा पुरस्कार; सुरक्षा कार्यातील योगदानाचे कौतुक

## रायगड जिल्ह्यातील दोन कर्मचाऱ्यांचा समावेश

**रोहे : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक धरम वीर मीना यांचे हस्ते दि. १७ रोजी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथे आयोजित कार्यक्रमात मध्य रेल्वेच्या ९ कर्मचाऱ्यांना महाव्यवस्थापक संरक्षा पुरस्कार देण्यात आले. यामध्ये रायगड जिल्ह्यातील दोन कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.

संरक्षा पुरस्कार मिळालेल्या मध्ये मुंबई विभागातील ४, भुसावळ विभागातील २, पुणे, नागपूर व सोलापूर विभागातील प्रत्येकी १ कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. कर्मचाऱ्यांनी ड्युटीवर असताना घेतलेली दक्षता, अनुचित घटना रोखण्यात व ट्रेन ऑपरेशनमध्ये सुरक्षा सुनिश्चित करण्यात त्यांनी दिलेले योगदान यासाठी हा पुरस्कार देण्यात आला. या पुरस्कारामध्ये पदक, प्रशंसा प्रमाणपत्र, अनुकरणीय संरक्षा कार्यासाठी प्रशस्तीपत्र आणि



**ही आहेत पुरस्कार प्राप्त व्यक्तींची नावे**

मुंबई विभागात रणजीत सिंग (ट्रेन मॅनेजर छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस), रोहित कौशिक (लोकोपायलट पनवेल), मृत्युंजय कुमार (ट्रॅक मेंटेनर कल्याण), अवधेश कुमार (ट्रॅक मेंटेनर, कर्जत),भुसावळ विभागात राहुल यशवंत बाविस्कर (तंत्रज्ञ सी अँड डब्लु भुसावळ), रितेश सुमंगल (पाली, ट्रॅक मेंटेनर भुसावळ), पुणे विभागात विश्वनाथ गायकवाड (खलासी पुणे), नागपूर विभागात श्री वेंकटरामन (लोको पायलट ताडाली नागपूर), सोलापूर विभागात नितीन मोहन शिंदे (ट्रॅक मेंटेनर लातूर सोलापूर)

२००० रुपये रोख देण्यात आले.

या वेळी आपल्या भाषणात, महाव्यवस्थापक मीना यांनी पुरस्कार विजेत्यांचे अभिनंदन केले आणि त्यांच्या कर्तव्याप्रती असलेल्या सतर्कतेचे आणि समर्पणाचे कौतुक केले. अशा प्रकारची दक्षता आणि धाडसी कृत्ये प्रवाशांच्या सुरक्षेसाठी प्रामाणिकपणे काम करण्यासाठी इतरांना प्रेरणा देतीलअसे ते म्हणाले.

यावेळीअतिरिक्त महाव्यवस्थापक आणि प्रधान मुख्य साहित्य व्यवस्थापक जगमोहन गर्ग, मुख्य संरक्षा अधिकारी चंद्र किशोर प्रसाद, मुख्य अभियंता रजनीश माथूर, प्रधान मुख्य परिचालन व्यवस्थापक एस एस गुप्ता, प्रधान मुख्य यांत्रिकी अभियंता सुबोध कुमार सागर, मुख्य विद्युत अभियंता (ऑपरेशन्स) एच.एम. शर्मा, इतर विभागांचे प्रधान प्रमुख आणि मध्य रेल्वेचे इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# जिल्हा क्रिकेट असोसिएशन प्रशिक्षक कमिटीच्या अध्यक्षपदी शंकर दळवी

**खोपोली : प्रतिनिधी**



रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशन तर्फे रायगड जिल्ह्यातील सर्व मुला–मुलींच्या सर्व वयोगटातील व खुल्या गटातील खेळाडूंच्या क्रिकेट प्रशिक्षणाची सर्व जबाबदारी शंकर दळवी यांच्याकडे देण्यात आली असुन कार्यकारणीच्या सभेत त्यांची प्रशिक्षक कमिटीच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली.

शंकर दळवी हे लेव्हल १ प्रशिक्षक म्हणून प्रमाणित आहेत. दळवी यांनी महाराष्ट्र रणजी संघाचे सहाय्यक प्रशिक्षक, महाराष्ट्र महिला संघाच्या १९व २३ वर्षाखालील व वरिष्ठ महिलांच्या संघाचे मुख्य प्रशिक्षक, बीसीसीएतर्फे घेण्यात आलेल्या स्पर्धेमध्ये पश्चिम विभागाच्या वरिष्ठ महीला संघासाठी मुख्य प्रशिक्षक म्हणून त्यांनी काम पाहिले आहे,

प्रत्येक वयोगटातील मुलामुलींचे सराव शिबिर घेणे, जिल्ह्यातील गुणवंत खेळाडूंचा शोध घेण्यासाठी टॅलेंट हंट सारखे उपक्रम राबविणे, विविध वयोगटातील व खुल्या गटातील संघांसाठी मुख्य व सहायक प्रशिक्षक नियुक्त करणे व रायगड जिल्ह्यातील क्रिकेट खेळाच्या प्रगतीसाठी योगदान देण्याची जबाबदरी शंकर दळवी यांच्याकडे देण्यात आली आहे.

# चौलमध्ये रस्ता साईड पट्टा व संरक्षीत कठड्याचा अभाव

## अपघातास निमत्रंण

**रेवदंडा : प्रतिनिधी**

चौल मुख्यः रस्त्याला साईड पट्टे व सरंक्षीत कठडयाचा अभावाने वाहनासाठी धोकादायक असून अपघातासनिमत्रंण देत असल्याचे दिसते.

दोन्ही बाजूकडील बागायती असलेल्या चौल मधील मुख्यः रस्ताला अनेक वळणे आहेत. मात्रठिकठिकाणी चौलच्या मुख्यः रस्ताला दोन्ही बाजूस साईड पट्टा व सरंक्षीत कठडयाचा अभाव दिसून येतो.

अलिबागहून येताना चौलमधील प्रसिध्द मुखरी गणपती मंदिर ते चौल भाटगल्ली मुख्यः रस्ताच्या डाव्या बाजूस साईड पट्टीचाअभाव आढळतो शिवाय बाजूस पावसाळी पाणी जाण्यासाठी खोलगट मार्ग आहे. येथील रस्ता अरूंद असल्याने दोन मोठी वाहने पास होताना, खुपच अडचणीचे ठरते, व वाहनांसाठी धोकादायक आहे. येथे साईडपट्टीवरून वाहने तेथील खोलगट भागात घुसण्याची दाट शक्यता आहे. हा रस्ता वाहनासाठी अपघातास निमत्रंणच आहे. या रस्ताच्या कडेला सरंक्षीत कठडे खुपच जरूरीचे आहेत. अन्यथा भविष्यात येथे मोठा अपघात घडण्याची शक्यता आहे.

अलिबागहून चौल कुष्णादेवी मंदिराचे वळणानंतर डाव्या बाजूस रस्ताला साईड पट्टीचा अभाव दिसून येतो, या रस्ताच्याकडेला मोठा खोलगट भाग आहे, मात्र तेथे वाढलेली झाडेझुडपे यामुळे हा खड्डा वाहन चालकांच्या निदर्शनास येत नाही. अलिबागहून वाहने चौलकडे येत असताना वाहन चालकांनी रस्ताच्या बाजूला वाहन नेल्यास साईड पट्टी नसल्याने वाहने या लांबलचक खड्ड्यात घसरण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे हा रस्ता सुध्दा धोकादायक झाला आहे. या रस्ताला सरंक्षीत कठडयाची अत्यंत गरजेचे आहे.



# मुख्यमंत्री रोजगार योजना गतिमानात पंधरवडा घोषित

**रायगड : रामप्रहर वृत्त**

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेचा गतिमानता पंधरवाडा दि. १७ ते ३० डिसेंबर २०२४ पर्यंत घोषित केला आहे. हा पंधरवाडा यशस्वी होण्यासाठी जिल्ह्यातील तालुक्यात या योजनेच्या जनजागृती मेळाव्यांचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक जी.एस. हरळ्या यांनी दिली आहे

महाविद्यालये, अभियांत्रिकी महाविद्यालये, औद्योगिक प्रशिक्षण संस्था इत्यादी ठिकाणी जनजागृती मेळाव्यात प्रचार व प्रसिध्दी करुन पात्र लाभार्थ्यांचे जागेवर अर्ज भरुन घेण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. एक जिल्हा एक उत्पादन तसेच भौगोलिक मांनाकन प्राप्त उद्योजकांचे अर्ज प्राधान्याने या पंधरवाड्यात मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम अंतर्गत घेण्यात येणार आहेत. या योजनेचा जास्तीत जास्त पात्र लाभार्थ्यांनी लाभ घ्यावा, आवाहन करण्यात येत आहे.

# मजगाव येथे अंजुमन महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे निवासी शिबिर

**मुरुड : प्रतिनिधी**

अंजुमन इस्लाम जंजिरा पदवी महाविद्यालय मुरुड–जंजिरा रायगड राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे सात दिवसीय विशेष निवासी शिबिर मजगाव येथे नुकतेच झाले. या शिबिराचे उद्घाटन झाले.

उदघाटनावेळी डॉ. टी. पी. मोकल राष्ट्रीय सेवा योजना जिल्हा समन्वयक, रायगड, अंजुमन विज्ञान महाविद्यालयाचे अध्यक्ष जैनुद्दीन उ. कादिरी तसेच महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. साजिद शेख यांची प्रमुख उपस्थिती होती. उदघाटनावेळी डॉ. टी.पी. मोकल यांनी शिबिरार्थिंना मोलाचे मार्गदर्शन केले. त्यांनी त्यांच्या भाषणात राष्ट्रीय सेवा योजना म्हणजे काय, राष्ट्रीय सेवा योजनेची ध्येय व उद्धीष्टे, राष्ट्रीय सेवा योजना व ग्राम शहर विकास,



व्यक्तिमत्व विकासात राष्ट्रीय सेवा योजनेचा वाटा या विषयांवर सखोल मार्गदर्शन केले.

या शिबिरादारम्यान विद्यार्थ्यांनी ग्रामस्वच्छता केली व प्लास्टिकचे संकलन केले तसेच गावातील सार्वजनिक ठिकाणाची साफसफाई करण्यात आली. शिबिरार्थिनी गावात नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरबाबत जनजागृती करण्यात आले व घरोघरी भेट देवून शिबिरा विषयी माहिती देण्यात आली.तसेच गावातील नदीकाठची स्वच्छता करण्यात आली. प्लास्टिक मुक्त भारत या अभियाना अंतर्गत वृत्तपत्रापासून पिशव्या बनवून बाजारामध्ये पिशव्याचे वाटप करण्यात आले. तसेच प्रत्येक दिवशी शिबिरार्थिंसाठी वेगवेगळ्या विषयावरती बौद्धिक व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले होते.

सात दिवसीय निवासी शिबिराचा समारोप समारंभाला महाविदयालयाचे अध्यक्ष जैनुद्दीन कादिरी तसेच महाविद्यालयचे प्रभारी प्राचार्यडॉ. साजिद शेख हे उपस्थित होते. ऍक्टिव्ह कॅम्पर व बेस्ट ग्रुप यांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. प्रमुख पाहुण्यांनी शिबिरार्थीना मार्गदर्शन करून शिबीर यशस्वीरित्या पार पाडल्याबद्दल शुभेच्छा दिल्या.

शिबिर यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. फिरोज शेख, प्रा. निदा गोरमे, प्रा. अल्ताफ फकीर, प्रा.सजगिन बडे व सर्व शिबिरार्थी यांनी विशेष मेहनत घेतली.


**इमारतीच्या पुनर्विकासासाठी निविदा मागविणेबाबत नोटीस**

१) गोविंद इलाइट सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, फायनल प्लॉट क्रमांक ५३५/१,(जुना सर्व्हे क्रमांक ७३५/ ए–१,७३६/ ए,७४१ (पार्ट), पनवेल,ता. पनवेल, जिल्हा रायगड, या गृहनिर्माण सहकारी संस्थेने आपल्या इमारतींचा पुनर्विकासाचा निर्णय घेतला असून संस्थेने नियुक्त केलेल्या वास्तुविशारदानी / प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यानी याबाबतचा प्रकल्प अहवाल तयार केला आहे. सदर प्रकल्प अहवालाची संस्थेचे चेअरमन/सेक्रेटरी यांचेकडे दिनांक १९/१२/२०२४ ते दिनांक २२/१२/२०२४ या कालावधीत सकाळी १०–०० ते दुपारी ३–०० या वेळेत या इमारतीच्या पुनर्विकासासाठी इच्छुक विकासक याना पाहणी करता येईल, व त्याआधारे पुनर्विकासासाठी इच्छुक विकासक यांचेकडून दिनांक २२/१२/२०२४ ते दिनांक २५/१२/२०२४ या कालावधीत सकाळी १०–०० ते दुपारी ३–०० या वेळेत आपल्या निविदा संस्थेचे चेअरमन/सेक्रेटरी यांचेकडे जमा कराव्यात. तसेच निविदा हया कमीत कमी रकमेला प्राधान्य अशा स्वरुपाच्या नसून सभासदाना योग्य वाटेल त्या विकासकाच्या निविदेची निवड सर्वसाधारण सभेत करण्यांत येईल. निविदा मंजूर किंवा नामंजूर करणेबाबतचा अधिकार सर्वस्वी संस्थेच्या सर्वसाधारण सभेचा असेल, त्याबाबत कोणतेही कारण देण्यास संस्था बांधील नाही.

दिनांक : १८/१२/२०२४

सही/– **चेअरमन** सही/– **सेक्रेटरी** सही/– **ट्रेझरर**

गोविंद इलाइट सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित.
पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड

# भारत-ऑस्ट्रेलिया गाबा कसोटी अनिर्णित

**ब्रिस्बेन : वृत्तसंस्था**

पाऊस आणि खराब हवामानामुळे गाबा कसोटी सामना अनिर्णित जाहीर करण्यात आला आहे. त्यामुळे पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेत दोन्ही संघ १-१ बरोबरीत आहेत. भारतीय संघाकडून केएल राहुल आणि रवींद्र जडेजा यांनी पहिल्या डावात शर्थीचे प्रयत्न करत सामन्यात संघाला कायम राहण्याचा प्रयत्न केला.

ऑस्ट्रेलियामधील पुढील कसोटी सामना मेलबर्नमध्ये होणार आहे, जो बॉक्सिंग डे कसोटी सामना असेल. संपूर्ण सामन्यात ऑस्ट्रेलियन संघाचा दबदबा होता, मात्र चौथ्या आणि शेवटच्या दिवशी टीम इंडियाने अप्रतिम खेळ दाखवला. ऑस्ट्रेलियाने टीम इंडियाला फक्त २७५ धावांचे लक्ष्य दिले होते, जे टीम इंडियाला गाठता आले असते, पण संपूर्ण दिवसात ब्रिस्बेनमध्ये पावसाची जोरदार हजेरी असल्याचे हवामान विभागाने आधीच सांगितले होते. टीम इंडियाने याआधीच्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर ऑस्ट्रेलियाविरुद्ध याच मैदानावर ३२८ धावांचा पाठलाग करण्याचा विक्रम केला होता.



जसप्रीत बुमराहने गाबा कसोटीत भारतीय संघासाठी चमकदार कामगिरी केली, त्याने पहिल्या डावात सहा आणि दुसऱ्या डावात तीन विकेट्स घेतल्या. या सामन्यात त्याच्या नावावर नऊ विकेट्स होत्या, तर भारताकडून केएल राहुल आणि रवींद्र जडेजा यांची खेळीदेखील निर्णायक ठरली. राहुलचे शतक १६ धावांनी हुकले, पण भारतासाठी आतापर्यंत या मालिकेत सर्वाधिक धावा करणारा खेळाडू राहुल आहे.

जडेजाने या सामन्यात ७७ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. ऑस्ट्रेलियाकडून ट्रॅव्हिस हेडने पहिल्या डावात १५२ धावांची खेळी केली, ज्यासाठी त्याला सामनावीर म्हणून निवडण्यात आले. हेडशिवाय स्टीव्ह स्मिथने पहिल्या डावात १०१ धावा केल्या. सध्याच्या घडीला पाच सामन्यांची कसोटी मालिकेत दोन्ही संघ सध्या बरोबरीत आहे. भारताचा पुढील चौथा सामना २६ डिसेंबरपासून मेलबर्नमध्ये खेळवला जाणार आहे, तर पाचवा सामना सिडनीमध्ये नवीन वर्षात खेळवला जाईल.

# रविचंद्रन अश्विनची आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीबाबत घोषणा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

गाबा कसोटीचा निकाल लागताच रविचंद्रन अश्विन याने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली. भारतीय क्रिकेट संघाचा खेळाडू म्हणून आजचा माझा शेवटचा दिवस असेल असे म्हणत अश्विनने निवृत्ती जाहीर करून सर्वांनाच धक्का दिला आहे.

गाबा कसोटीत पावसामुळे सामना थांबला होता, तेव्हा विराट कोहलीबरोबर बोलताना अश्विन खूप भावूक झालेला दिसला. विराट त्याला मिठी मारत त्याचे सांत्वन करताना दिसला, ज्याचा व्हिडीओही व्हायरल होताच त्याच्या निवृत्तीची चर्चा सुरू होती आणि सामना संपताच त्याने निवृत्ती जाहीर केली. गाबा कसोटी संपताच अश्विनने निवृत्ती घेत असल्याले पत्रकार परिषदेत सांगितले.

अश्विन हा भारतीय कसोटी इतिहासातील आतापर्यंतचा सर्वात यशस्वी फिरकीपटू ठरला आहे. या दौऱ्यात त्याला आतापर्यंत फक्त एकच सामना खेळण्याची संधी मिळाली. डलेडनंतर तो गाबा कसोटीच्या प्लेईंग इलेव्हनमधून बाहेर झाला होता. गाबा कसोटीदरम्यान अश्विन टीम इंडियाच्या खेळाडूंना मिठी मारताना दिसला. त्याने कर्णधार रोहित शर्मा आणि विराट कोहलीला मिठी मारली. अश्विनने मुख्य प्रशिक्षक गंभीर यांच्याशीही बराच वेळ चर्चा केली आणि त्यानंतर पत्रकार परिषदेत येऊन निवृत्ती जाहीर केली.

**अशी आहे कारकीर्द**

आर अश्विनने कसोटी क्रिकेटमध्ये १०६ सामन्यात ५३७ विकेट घेतल्या आहेत. त्याच्या नावावर ३७ वेळेस पाच विकेट घेतले आहेत आणि आठ वेळा सामन्यात १० विकेट घेतल्या आहेत. अश्विनने १५६ एकदिवसीय विकेट्सही घेतल्या आहेत, तर टी-२०मध्ये ७२ विकेट्स आहेत. त्याच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीत त्याने एकूण ७६५ विकेट्स घेतल्या आहेत. अश्विनने फलंदाज म्हणूनही आपली छाप सोडली. कसोटी क्रिकेटमध्ये त्याच्या नावावर ३५०३ धावा आहेत आणि त्याने एकूण सहा कसोटी शतके झळकावली आहेत. प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये त्याच्या नावे एकूण आठ शतके होती.



**आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाच्या सर्व फॉरमॅटमध्ये भारतीय क्रिकेटपटू म्हणून हा माझा शेवटचा दिवस असेल. मी क्लब-क्रिकेट खेळत राहीन. अनेक सहकाऱ्यांबरोबर खूप आठवणी निर्माण केल्या आहेत. आता मी कोणत्याही प्रश्नांची उत्तरे देऊ शकणार नाही. हा खूपच भावूक करणारा प्रसंग आहे.**
**-रविचंद्रन अश्विन**

# बुमराहने टाकले कपिल देव यांना मागे

## ऑस्ट्रेलियन भूमीवर भारताकडून घेतल्या सर्वाधिक विकेट्स

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय गोलंदाज जसप्रीत बुमराहने गाबा कसोटीत पाचव्या दिवशी मार्नस लबुशेनची विकेट घेत ऑस्ट्रेलियन भूमीवर इतिहास घडवला आहे. आता बुमराहने टीम इंडियाचे माजी दिग्गज कर्णधार कपिल देव यांचा मोठा विक्रम मोडत पहिले स्थान गाठले आहे. बुमराहने बॉर्डर-गावसकर ट्रॉफीमध्ये आतापर्यंत शानदार गोलंदाजी केली आहे.



गाबा कसोटीच्या दुसऱ्या डावात बुमराहने मार्नस लबुशेनची दुसरी विकेट घेतली, तर पॅट कमिन्सला बाद करत बुमराहने तिसरी विकेटही मिळवली. बुमराह आता ऑस्ट्रेलियात सर्वाधिक विकेट घेणारा भारतीय गोलंदाज बनला आहे. यापूर्वी हा विक्रम भारताचे माजी दिग्गज कर्णधार कपिल देव यांच्या नावावर होता, ज्यांनी ऑस्ट्रेलियाच्या भूमीवर गोलंदाजी करताना ५१ विकेट्स घेतले होते. बुमराहच्या नावावर आता ऑस्ट्रेलियात ५३ विकेट्स आहेत. या यादीत तिसऱ्या क्रमांकावर भारताचा माजी फिरकीपटू दिग्गज अनिल कुंबळे आहे, ज्याने ऑस्ट्रेलियात ४९ विकेट घेतल्या आहेत. याशिवाय आर अश्विन ४० विकेट्ससह चौथ्या स्थानावर कायम आहे.

# जागतिक पिंच्याक सिलॅट स्पर्धेसाठी महाराष्ट्रातील १५ खेळाडूंची निवड



**पाली : प्रतिनिधी**

पाचवी जूनिअर व वरिष्ठ वयोगट जागतिक पिंच्याक सिलॅट स्पर्धा १८ ते २२ डिसेंबर २०२४ रोजी दुबई अबू धाबी येथे होणार आहेत या स्पर्धेसाठी ४४ देशातून खेळाडू सहभाग घेणार भारतातील एकूण विविध वयोगटांमधून १२० खेळाडू सहभागी झालेले आहेत

या दोन्हीही स्पर्धेसाठी भारताच्या संघामध्ये महाराष्ट्रातील १५ खेळाडूंची निवड झालेली आहे त्यांचे प्रशिक्षक किशोर प्रकाश येवले असून शिवतेज पाटील, वरद शेट्ये, अर्णव गवई, प्रथमेश दत्तू दातीर, रामचंद्र बदक, सोमनाथ सोनवणे, वैभव काळे, कृष्णा पांचाळ, ओमकार अभंग, पियुष शुक्ला, हर्षवर्धन भोसले, रिया चव्हाण, प्राजक्ता जाधव, भक्ती किल्लेदार, जयश्री शेट्ये हे आहेत. सर्व खेळाडूना इंडियन पिंच्याक सिलॅटचे अध्यक्ष किशोर प्रकाश येवले चेअरमन मोहम्मद इक्बाल व मॅनेजर इरफान अजीज बुटा व महाराष्ट्र पिंच्याक सिलॅटचे अध्यक्ष सुरेंद्रप्रताप सिंह खजिनदार मुकेश सोनवणे व महाराष्ट्र पिंच्याक सिलॅटचे सर्व सदस्य यांनी खेळाडूंचे प्रोत्साहन वाढवून खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. पिंच्याक सिलॅट हा खेळ इंडोनेशियन मार्शल आर्ट खेळ प्रकार असून (१) टॅंडिंग फाईट) (२) तुंगल(क) (३) रेगु (ग्रुप काता) (४) गंडा (डेमो फाईट) (५)सोलो (क्रिएटिविटी) या पाच प्रकारात खेळला जातो. १ सप्टेंबर २०२०ला या खेळाचा समावेश भारतीय क्रिडा मंत्रालय, भारत सरकार यांनी आपल्या ५ टक्के राखिव नोकर भरतीमध्ये केला आहे. या खेळाला युवक कल्याण आणि क्रिडा मंत्रालय भारत सरकार, भारतीय विश्वविद्यालय संघ अखिल भारतीय पोलीस खेळ नियंत्रण बोर्ड ऑलिम्पिक कांऊसिल ऑफ एशियाची मान्यता आहे.

हा खेळ एशियन गेम, एशियन मार्शल आर्ट्सगेम एशियन यूथ गेम व एशियन बीच गेम, भारतीय विश्वविद्यालय खेळ अशा ऑफिशियल राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्पर्धा मध्ये खेळला जातो. या खेळाचा समावेश गोव्या मध्ये झालेल्या ३७व्या राष्ट्रकुल स्पर्धेमध्ये १४ मे २०२३ रोजी भारतीय ऑलिम्पिक असोसिएशनने केला होता. त्या मध्ये महाराष्ट्र संघाने २१ पदके मिळवली.



# राज्य मास्टर्स गेम्समध्ये मानेंची 'उत्तम' कामगिरी

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र मास्टर्स गेम्स स्पर्धा नाशिक येथे नुकतीच झाली. या स्पर्धेत नवी मुंबईच्या सानपाडा येथील ज्येष्ठ नागरिक संघाचे सदस्य उत्तम माने यांनी सहभाग घेऊन घवघवीत यश संपादन केले आहे.

माने यांनी थाळीफेक स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले असून भालाफेक आणि हातोडाफेकमध्ये रौप्यपदक जिंकले आहे. स्पर्धेत महाराष्ट्राच्या २१ जिल्ह्यांतील सुमारे ७८० खेळाडू सहभागी झाले होते.

# राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा सांगलीत

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशच्या मान्यतेने सांगली जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या विद्यमाने व युवक मराठा क्रीडा संस्था यांच्या सहकार्याने २८ डिसेंबर ते १ जानेवारी या कालावधीत ५१व्या कुमार-कुमारी गट राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. राज्य कबड्डी असोसिएशनचे उपाध्यक्ष व माजी आमदार दिनकर



पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त ही स्पर्धा सांगलीच्या सांगलवाडी येथील चिंचबाग मैदानावर होईल.

मातीच्या सहा क्रीडांगणावर होणारी ही स्पर्धा सकाळ व सायंकाळ या दोन्ही सत्रात खेळविण्यात येणार आहे. या स्पर्धेत सहभाग घेतलेल्या सर्व संलग्न जिल्हा मुलींच्या संघाने दिनांक २७ डिसेंबर रोजी सायंकाळी ४ वाजता स्पर्धेच्या स्थळी आपली उपस्थिती राखावी. त्याच दिवशी मुलींची वजने व छाननी केली जाईल, तर मुलांच्या सर्व संघांनी २९ डिसेंबर रोजी सायंकाळी ४ वा. आपली उपस्थिती राखावी. त्याच दिवशी मुलांची वजने व छाननी होईल.

सर्व जिल्हा संघटनांच्या सचिवांनी याची नोंद घेऊन सहकार्य करावे, असे आवाहन राज्य कबड्डी असोसिएशनचे सचिव बाबुराव चांदेरे यांनी केले आहे.

या स्पर्धेतून निवडण्यात आलेला कुमार-कुमारी गटाचा संघ ८ ते ११ जानेवारी या कालावधीत हरिद्वार येथे होणाऱ्या राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करेल.




# एमईएस विद्या मंदिरचा बालक्रीडा महोत्सव

**नवी मुंबई : बातमीदार**

रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त बेलापूरच्या एमईएस विद्या मंदिर येथे स्पोर्टस् कार्निव्हलचे आयोजन करण्यात आले होते. जवळपास ७० ते ८० प्री स्कूलच्या ३ ते ६ वयोगटातील विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत भाग घेतला. ऑन द स्पॉट एण्ट्रीही अनेक होत्या.

प्रमुख पाहुणी राष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग खेळाडू श्रावणी पाटील हिने स्पोर्टस् कार्निव्हलचे उद्घाटन केले. स्पर्धांची सुरुवात धावण्याच्या शर्यतीने झाली. त्यानंतर अडथळा शर्यत आणि बॉल बॅलन्सिंग स्पर्धा झाल्या. एमईएस विद्या मंदिरच्या लहान मुलांनी सहभाग घेत आनंद लुटला. प्री स्कूलचे मुख्याध्यापकही बालकांना प्रोत्साहन देण्यासाठी उपस्थित होते.

या वेळी सेल्फी पॉइंट ठेवले होते. विद्यार्थ्यांच्या पालकांनी सेल्फी पॉइंटवर फोटो क्लिक करून आठवणी साठवून ठेवल्या. सर्व स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले, तर प्रथम तीन विजेत्यांना पदके, प्रमाणपत्रे आणि बक्षिसे देऊन गौरविण्यात आले.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com